प्रकरण : एक

# ग्रामीण कादंबरी : वाटचाल व विकास

## प्रकरण – एक

# ग्रामीण कादंबरी : वाटचाल व विकास

**प्रस्तावना :**

प्रस्तुत प्रबंधिकेत रा. रं. बोराडे यांच्या 'सावट' (१९८७) व 'चारापाणी' (१९९०) या दोन कादंबऱ्यांचा अभ्यास करावयाचा आहे. मराठी ग्रामीण कादंबरीच्या क्षेत्रात रा. रं. बोराडे हे एक महत्त्वाचे ग्रामीण लेखक आहे. बोराडे यांनी कथा, कादंबरी, नाटक, समीक्षा इ. वाङ्मयप्रकार हाताळलेले आहेत. ग्रामीण भागातील सामाजिकता, वास्तवता आणि मानवी जीवनातील नातीगोती यांचे संबंध आणि समस्या यांचे चित्रण बोराडेंनी आपल्या साहित्यात केले आहे. ग्रामीण जीवन हे बोराडे यांच्या लेखनाचे आस्थाकेंद्र आहे. म्हणूनच त्यांच्या 'सावट' आणि 'चारापाणी' या दोन कादंबऱ्यांचा आशय आणि अभिव्यक्तीच्या अंगांनी विचार करण्याचे ठरविलेले आहे.

या प्रकरणामध्ये ग्रामीण कादंबरीची वाटचाल आणि विकास यांचा आढावा घ्यावयाचा आहे. त्यापूर्वी 'ग्रामीण' आणि 'प्रादेशिक' या संज्ञा समजावून घेणे आवश्यक वाटते. ग्रामीण कादंबरीचा कलेच्या दृष्टीने वेगळा असा काही प्रकार नाही. इतर कादंबरीप्रमाणे ती एक कादंबरी आहे. मराठी साहित्यापासून 'ग्रामीण साहित्य' हे वेगळे आहे असे म्हणता येत नाही. तेही मराठी साहित्याचाच एक भाग आहे. याविषयी 'ग्रामीणताः साहित्य आणि वास्तव' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत स. शि. भावे म्हणतात, "... ही विशेषणे ज्या विशेषांचा निर्देश करतात, ते विशेष स्थळ व काळ या संदर्भात प्रथम जाणवतात. ऐतिहासिकता, किंवा ग्रामीणता, किंवा दलितता ही स्थळकाळाच्या संदर्भात प्रथम सापडते. कलाकृतीत शिवाजी महाराजांचा काळ आहे, मग कलाकृती 'ऐतिहासिक', माणदेशचा परिसर आहे, मग कलाकृती 'ग्रामीण'.[१]

स. शि. भावे यांचे विवेचन तसे ढोबळ स्वरूपाचे आहे. कारण सर्वच कादंबऱ्यांमध्ये कोणत्यातरी प्रदेशाचे चित्रण हे येतच असते. परंतु सर्वच कादंबऱ्यांना प्रादेशिक म्हटले जात नाही. सदाशिव पेठ हाही एक प्रदेशच आहे. तरीही हरिभाऊंच्या कादंबऱ्यांना प्रादेशिक म्हटले जात नाही. अशावेळी ते वातावरण ग्रामीण आहे की, शहरी आहे की, प्रादेशिक आहे ते पहावे लागते. 'ग्रामीण' या विशेषणाने ओळखल्या जाणाऱ्या साहित्यातून व्यक्त होणाऱ्या जाणिवा वेगळ्या स्वरूपाच्या आहेत. ग्रामीण जीवन साहित्यापासून वंचित राहिलेले होते. अलिकडे खेडोपाडी शिक्षणाचा प्रसार झाला. त्यामुळे ग्रामीण भागातील नवशिक्षित पिढी आपले ग्रामीण

जीवनानुभव साहित्यात मांडू लागली. सुरूवातीस तर गांधीवादातून ग्रामीण साहित्यास प्रेरणा मिळाल्याचे दिसते.

ग्रामीण साहित्य म्हणजे काय हे सांगताना आनंद यादव 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या' या ग्रंथात म्हणतात, "खेडेगाव, तेथील जीवनपद्धती, तेथील अशा खास रीती, शेती, तेथील निसर्गाशी, मातीशी असलेले मानवी पण प्रदेशनिष्ठ वैशिष्ट्यपूर्ण संबंध, तेथील एकूण संस्कृतीला लाभलेली काही वैशिष्ट्ये, मानवी जीवनाला त्याच प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, ज्ञानविषयक मर्यादा व त्यातून उद्भवणारे प्रश्न आणि समस्या."[२] इत्यादी वैशिष्ट्यातून ग्रामीण साहित्य व्यक्त होते. यादव यांचे हे विवेचन योग्य वाटते कारण खेडे म्हटले की निसर्ग आणि शेतीशी तेथील मानवी जीवनाचा संबंध अपरिहार्यपणे येतच असतो. त्यांची विशिष्ट अशी जगण्याची रीत असते. त्यामुळे काही मर्यादाही या जीवनात जाणवतात. शेतीवरच या ग्रामीण लोकांचे आर्थिक व्यवहार पार पडत असतात.

ग्रामीण जीवनात शेतीला असलेले महत्त्व सांगताना आनंद यादव म्हणतात, "कृषिप्रधानता, शेतीचा उद्योग हा खेड्यांचा आत्मा आहे. हा आत्मा जोवर नाहीसा होत नाही तोवर भारतीय खेडे कितीही सुधारले तरी खेडेच राहणार आहे, हे उघड आहे. त्यामुळे भारतीय जीवनात व संस्कृतीत ग्रामीण साहित्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. 'इथल्या मातीचे दर्शन घडविणारे' ते खास ग्रामीण साहित्य आहे. ग्रामीण जीवनाचा आत्मा असलेली शेती आणि ती कसणारे शेतकरी हेच ग्रामीण साहित्याचा आत्मा का असतात याची कल्पना यावरून येईल."[३]

आनंद यादव यांचे वरील विवेचन पटते कारण भारत हा कृषिप्रधान देश आहे. बहुतांशी लोक खेड्यात राहतात, त्यांचे सारेच जीवन शेतीवर अवलंबून असते. त्यामुळेच द. ता. भोसले यांना "हा निसर्ग कधी भक्षक वाटतो तर कधी रक्षक वाटतो."[४] दुष्काळ पडला तर हा निसर्ग मानवास आणि पशुपक्ष्यांना मारक ठरतो. दोनवेळच्या अन्नाला, जनावरांच्या चारापाण्याला महाग व्हावे लागते. मात्र सुकाळ असेल तर हे खेडूत लोक सण, उत्सव अत्यानंदाने साजरे करतात. निसर्ग तारक व्हावा, त्याचा कोप होऊ नये म्हणून निसर्गपूजेसारखे विधीही खेड्यात केले जातात.

ग्रामीण साहित्य म्हणजे काय सांगताना नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, "ग्रामीण जीवनातून फुलणारे, ग्रामीण वास्तवातून साकार होणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य"[५] या नागनाथ कोत्तापल्ले यांच्या विधानावरून असे स्पष्ट होते की ग्रामीण जीवन शेती, निसर्ग,

गावगाडा, ग्रामीण संस्कृती, कुटुंबव्यवस्था, जातीरचना यावर अवलंबून असते. 'ग्राम' म्हणजे गाव, खेडे असा अर्थ होतो. अशा ग्रामीण जीवनाचे, खेड्याचे चित्रण करताना त्रिं. ना. अत्रे लिहितात, ''खेडे म्हटले की, अगोदर चटकन काळीच डोळ्यांपुढे उभी राहते. शेते, पिके, गवत, झाडे, गुरेढोरे, शेळ्यामेंढ्या, मेंढके, शेतकरी, गुराखे, पाट, बुडक्या, विहिरी, नांगर, कुळव, मोट, मळा, गोफण वगैरे बळीराजाचे वैभव खेड्याचे नाव काढताच इतके मन व्यापून टाकते की, खेड्यात शेतीखेरीज दुसरा रोजगार चालत असेल किंवा शेतकऱ्यांखेरीज दुसरे कोणी रहात असेल एकाएकी मनातही येत नाही. कुणबी पुढे झाल्याखेरीज एकाही खेड्यांची वसाहत झाली नाही. त्याने धान्य पैदा करून इतरांच्या खाण्याची तरतूद केली, तेव्हा इतर गोळा झाले.''[६]

त्रिं. ना. अत्रे यांनी खेड्याचे अतिशय चांगले, जिवंत चित्र उभे केले आहे. म्हणजेच काय तर खेडे म्हटले की, शेती, शेतकरी, त्यास मदत करणारे अलुते-बलुतेदार, शिवाय फिरस्ते, कुटुंबव्यवस्था, जातिव्यवस्था असे सर्व घटक डोळ्यापुढे आपोआप येतात. अत्रे यांनी सांगितलेल्या सर्व घटकांचा समावेश ग्रामीणतेमध्ये होतो. त्यांचेच चित्रण ग्रामीण साहित्यातून व्यक्त होत असते. 'ग्रामीण साहित्य' ही वर्णनपर संज्ञा आहे. ती काही मूल्यवाचक नाही. इतर साहित्यासारखेच तेही एक आहे. ग्रामीण संवेदनशीलता असणारा लेखकच अस्सल निर्मिती करू शकेल. परिसराचा संस्कार लेखकावर कसा होतो हे सांगताना मधू कुलकर्णी लिहितात, ''लेखकाचा परिसर हे त्याच्या लेखनाचे एक अविभाज्य अंग होऊन बसते. जसा व्यंकटेश माडगूळकरांच्या कथांतील माणदेशचा परिसर त्यांच्या लेखनाचे एक अंग आहे. ग्रामीण लेखकाच्या लेखनातून तो तो परिसर उत्कटपणे आणि कलात्मक पातळीवरून आविष्कृत झालेला असतो. हे लेखन त्या परिसराशी एकजीव झालेले असते. नागरी जीवनापासून दूर असलेल्या अशा परिसरातील जीवन आविष्कृत करणाऱ्या साहित्याला ग्रामीण साहित्य म्हटले जाते.''[७]

मधू कुलकर्णी यांचे वरील विवेचन योग्य आहे. कारण कोणताही लेखक त्याच्या परिसरातून घडत असतो. त्याचा जन्मच खेड्यात झाल्यामुळे, लहानपणापासून त्याच्या मनावर तेथील समाज- जीवनाचे काही संस्कार झालेले असतात. हे संस्कार अगदी खोलवर रूजलेले असतात. म्हणूनच तो तो परिसर त्यांच्या लेखनातून अपरिहार्यपणे येत असतो. परिसराचा मनावर झालेला संस्कार कोणताच लेखक सहज पुसू शकत नाही. गो. मा. पवार याविषयी

म्हणतात, "... लेखक कोणत्या वातावरणात वाढतो, कोणते संस्कार ग्रहण करतो यावर त्याच्या व्यक्तिमत्त्वाची घडण अवलंबून असते. त्याचे व्यक्तिमत्त्व कसे आहे यावर त्याची अनुभव घेण्याची क्षमता व धाटणी ठरत असते. अनुभव घेण्याच्या त्याच्या या क्षमतेला व धाटणीला आपण लेखकाची संवेदनशीलता म्हणतो. जो लेखक ग्रामीण जीवनात वाढलेला, घडलेला असेल, ज्याने ग्रामीण जीवनाचा गाभा आत्मसात केला असेल त्याची संवेदनशीलता ही ग्रामीण संवेदनशीलता म्हणता येईल."[८] ही ग्रामीण संवेदनशीलता गो. मा. पवार यांना महत्त्वाची वाटते. ग्रामीण जीवनाचं चित्रण, ग्रामीण मनांचे चित्रण या साहित्यात येत असते. ग्रामीण जीवनचित्रणातून ग्रामीण साहित्य आकार घेत असते. ग्रामीण वास्तवातून हे साहित्य फुलत असते कारण ग्रामीण जीवनाशी ते संबंधित असते.

मराठी ग्रामीण कादंबरीचा अभ्यास करताना 'ग्रामीणता' आणि 'प्रादेशिकता' या संज्ञा समजावून घेणे आवश्यक आहे. 'प्रादेशिक' ही संज्ञा प्रथम वि. स. सुखटणकर यांनी 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' या कथासंग्रहावर 'आठ प्रादेशिक कथा' असे शीर्षक छापले होते. कारण त्यामध्ये गोमंतकीय जीवनाचे चित्रण वैशिष्ट्यपूर्ण असेच आहे. तर र. वा. दिघे यांना 'प्रादेशिक कादंबरीकार' असे म्हटले जाते परंतु त्यांनी मात्र 'ग्रामीण' हा शब्द वापरला आहे. पेंडसे-दांडेकर यांच्या कोकणचे जीवनचित्रण करणाऱ्या कादंबऱ्या आणि माडगूळकरांच्या 'बनगरवाडी' मुळे 'प्रादेशिक' हा शब्द पुढे आला. 'ग्रामीण' आणि 'प्रादेशिक' या संज्ञांमध्ये निश्चितच फरक आहे. प्रादेशिकता ही व्यापक अशी संज्ञा आहे. तरीही दोन्ही नावांनी ओळखल्या जाणाऱ्या वाङ्मयात 'ग्रामीणता' हा घटक समान आहे. त्यासंदर्भात आनंद यादव म्हणतात, "ग्रामीण हा शब्द त्या प्रदेशातील शहरी वाङ्मयाला व्याघात करणारा आहे. म्हणूनच प्रादेशिक वाङ्मय असे न म्हणता ग्रामीण वाङ्मय असाच शब्दप्रयोग करणे योग्य वाटते."[९]

आनंद यादव यांचा 'ग्रामीण' या संकल्पनेवर अधिक भर असलेला दिसतो. प्रादेशिक वाङ्मय हेही ग्रामीण वाङ्मयच असे यादव यांना वाटते. परंतु हे बरोबर नाही. ते असेही म्हणतात की, "एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोकजीवन, संस्कृती, परंपरा, जीवनसंकेत, रीती, समूहजीवनातील भावभावना आणि या सर्वांतून निर्माण झालेल्या समस्या आणि जीवननाट्य यांचे दर्शन घडविण्याच्या उद्देशाने ज्या कादंबऱ्या लिहिल्या जातात; त्यांना प्रादेशिक कादंबऱ्या असे म्हणता येईल."[१०] यादव यांचे हे मत योग्य वाटते कारण 'प्रादेशिक' ही संज्ञा

ग्रामीणतेपेक्षा व्यापक आहे. ग्रामीण वाङ्मयात समूहजीवन अपेक्षित नसते. एखाद्या व्यक्तीचं जीवनदर्शनही ग्रामीण वाङ्मयात चालते. मात्र प्रादेशिकता म्हटली की आपोआपच व्यापक असा भूप्रदेश डोळ्यापुढे येतो. प्रादेशिकता म्हणजे त्या प्रदेशातील सर्व काही असा अर्थ अभिप्रेत असला तरी फक्त ग्रामीण स्वरूपाचेच लोकजीवन यावे, शहरी जीवनचित्रण येऊ नये अशीही नकळत अपेक्षा असते. एखाद्या ग्रामीण कादंबरीला प्रादेशिक स्वरूपही लाभते. उदा. 'बनगरवाडी'.

'ग्रामीण' आणि 'प्रादेशिक' हा भेद स्पष्ट करताना असे लक्षात येते की, त्या त्या प्रदेशातील 'ग्राम' विभागाचेच समूहदर्शन प्रादेशिक वाङ्मयात येते आणि त्या त्या ग्रामविभागातील व्यक्तिनिष्ठ जीवनचित्रण ग्रामीण वाङ्मयात येत असते. हा भेद स्पष्ट करताना नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, "...'प्रादेशिकते'चे ग्रामीणत्त्वाशी निश्चितच काही बाबतीत साम्य असते, परंतु या दोन्ही संज्ञा एकच आहेत असे मात्र नाही. तसेच या दोन्ही संज्ञांनी निर्देशित होणारा अर्थही सारखाच असतो असेही नाही, ते परस्पर समांतर असतील; परंतु एक नव्हेत कारण प्रादेशिक साहित्य ग्रामजीवनाला, ग्रामसंस्कृतीला फारसे महत्त्व देत नाही तर ते महत्त्व देते ते एका विशिष्ट प्रदेशाच्या समग्र टप्प्याला. 'कधी ग्रामजीवन आलेच तर ते स्वतंत्रपणे येत नाही. ते येते ते त्या प्रदेशातील समग्र संस्कृतीचा एक भाग म्हणून. येथे ग्रामसंस्कृतीपेक्षा त्या प्रदेशाचा टापू अधिक महत्त्वाचा असतो. त्यादृष्टीने प्रादेशिक साहित्यातून व्यक्तिकेंद्रितता दिसत नाही, तर समूहकेंद्रितता हे या साहित्याचे वैशिष्ट्य असते.''[११]

नागनाथ कोत्तापल्ले यांचे मत अगदी रास्त असेच आहे. त्यांनी 'ग्रामीण' आणि 'प्रादेशिक' या संज्ञामध्ये भेद हा निश्चितपणे मांडलेला आहे. या संज्ञा भिन्न आहेत असे ते ठामपणे म्हणतात. तसेच काही बाबतीत दोहोत साम्य आहे हेही ते आवर्जून सांगतात. प्रादेशिकतेमध्ये त्या प्रदेशाचा टापू अधिक महत्त्वाचा असतो. प्रादेशिक साहित्यात जरी एखादी व्यक्ती प्रमुख असली तरी ती त्या संपूर्ण प्रदेशाचे प्रतिनिधित्त्व करीत असते. ती व्यक्ती तेथील प्रदेशाशी बांधलेली असते. समूहकेंद्रितता हे एक प्रादेशिकतेचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये कोत्तापल्ले सांगतात. एक सबंध प्रदेशच त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वात मुरून गेलेला असतो. त्यामुळे प्रादेशिकता अपरिहार्यपणे साहित्यात येत असते.

प्रादेशिकतेचे वेगळेपण सांगताना रा. रं. बोराडे लिहितात, "माणसाची कातडी बाजूला काढून जसा आपण माणसांचा विचार करू शकत नाही तसाच तो विशिष्ट प्रदेश

बाजूला ठेवून त्या प्रदेशातल्या व्यक्तीचा विचार करू शकत नाही. ज्या प्रदेशात जे जन्म घेतात, वाढतात, त्या प्रदेशातला निसर्ग, तेथील लोकांचे आचारविचार, सामाजिक संकेत या सर्वांचा संस्कार घेऊनच त्यांचे जीवन घडत असते. इथल्या मातीने त्या व्यक्तीमनाला जन्म दिलेला असतो. त्याच्या नसानसातून ते पाणी मुरलेले असते. त्याच्या कातडीचा रंगदेखील इथल्या हवामानानेच बनलेला असतो. त्यांच्या मनाचा धर्म इथल्या निसर्गाने घडविलेला असतो. पुढेमागे हा प्रदेश जरी सोडला तरी त्यांच्या मनावरचे हे धर्म पुसले जात नाहीत. प्रादेशिकता अपरिहार्य आहे ती याच अर्थाने''[१२]

रा. रं. बोराडे यांचे वरील विवेचन पटते कारण जसे साहित्य हे लेखकाचे अपत्य असते त्याचप्रमाणे लेखकही त्याच्या समाजाचं अपत्य असतो. प्रादेशिक साहित्याच्या दृष्टीने तो भौगोलिक प्रदेशच्या प्रदेश महत्त्वाचा असतो. त्या सबंध प्रदेशाचे मिळून तेथील लोकजीवन तयार झालेले असते, ते महत्वाचे असते. या प्रदेशातील माणसे निसर्गनिष्ठ व्यवसाय करीत असतात. त्यामुळे त्यांचा निसर्गाशी घनिष्ठ असा संबंध असतो. येथील निसर्गाकडून तेथील व्यक्तीवर निश्चितच काही संस्कार झालेले असतात. त्यामुळे त्या प्रदेशातील व्यक्तींचे स्वभावही काही प्रमाणात तरी विशिष्ट स्वरूपाचे झालेले असतात. ते संस्कार, धर्म कायम टिकत असतात.

उदा. उद्धव शेळके यांची 'धग', गो. नी. दांडेकर यांची 'पडघवली', 'पवना काठचा धोंडी' इ.

प्रादेशिकतेचे संस्कार लेखकावर कसे होतात, याविषयीचं अविनाश सप्रे यांचे विवेचन महत्त्वाचे वाटते. ते म्हणतात, ''लेखक ज्या प्रदेशात जगला, वाढला, जी माणसे त्यानं बघितली, जिथला निसर्ग त्यानं मनसोक्त उपभोगला, त्या सबंध परिसराला तिथल्या रंगगंधासह, त्यातल्या जीवननाट्यासह, बऱ्यावाईट, उभ्या-आडव्या, सरळप्रमाथी प्रेरणा आणि अनुभवासकट जिवंत करण्याची उत्कट धडपड अशा कादंबऱ्यांतून दिसून आली. तिथल्या माणसांच्या अंतरंगाचे नेमके चित्रण त्यातून प्रत्ययाला आले.''[१३] अविनाश सप्रे यांचे हे मत रास्त आहे. कारण कोणताही लेखक त्याच्या समाजातून घडत असतो. तेथील लोकांचे जीवन त्याने फक्त पाहिलेले नसते तर तो स्वतः ते जीवन जगलेला असतो. त्या प्रदेशाचे काही संस्कार, रूढी, परंपरा त्याला पूर्णपणे माहीत असतात. तेथील लोकांच्या जीवनातील सुखदुःखे, संघर्ष लेखक आपल्या कलात्मकतेने साहित्यात चित्रित करीत असतो. प्रादेशिक बोली हा त्या प्रदेशातील लोकजीवनाचाच एक भाग असतो. प्रमाणभाषेपेक्षा प्रादेशिक

बोलीमध्ये जिवंतपणा अधिक असतो. प्रादेशिक कादंबरीची बाकीची वैशिष्ट्ये इतर कादंबरीसारखीच असतात.

ग्रामीण वाङ्मय आणि प्रादेशिक वाङ्मय यातील भेद नेमक्या शब्दात सांगताना रवींद्र ठाकूर लिहितात, ''प्रादेशिक वाङ्मय म्हणजे ग्रामविभागाचे समूहजीवनदर्शन आणि ग्रामीण वाङ्मय म्हणजे ग्रामविभागातील समूहजीवन टाळून केलेले व्यक्तिनिष्ठ जीवनदर्शन असा हा भेद आहे.''[१४] ठाकूर यांच्या विवेचनात अचूकता आहे. कारण समूहजीवनदर्शन हे प्रादेशिकतेचे आणि व्यक्तिनिष्ठ जीवनदर्शन हे ग्रामीणतेचे विशेष आहेत. 'ग्रामीण' आणि 'प्रादेशिक' या संज्ञा समजावून घेताना त्यांचे काही विशेष जाणवतात. त्यामध्ये कृषी संस्कृती, ग्रामीण बोली, निसर्गसन्मुखता, कुटुंबव्यवस्था, जातीव्यवस्था, व्यक्ती हीच केंद्रस्थानी अशी ग्रामीणतेची वैशिष्ट्ये दिसतात. तर प्रादेशिकतेमध्ये विशिष्ट प्रदेशातील लोकजीवन, तेथील संस्कृती-परंपरा, शेती, समूह जीवन, त्या विशिष्ट प्रदेशातला निसर्ग, त्यांच्या समस्या, जीवननाट्य, संपूर्ण प्रदेशच केंद्रस्थानी अशी वैशिष्ट्ये दिसतात. अशी वैशिष्टे असलेल्या कादंबऱ्यांना 'ग्रामीण' आणि 'प्रादेशिक' कादंबऱ्या म्हणता येईल.

ग्रामीण कादंबरी म्हणजे काय सांगताना आनंद यादव लिहितात, ''भारतीय (पर्यायाने मराठी) खेड्याचा आत्मा असलेली शेतीप्रधान जीवनपद्धती किंवा संस्कृती जिच्यातून आविष्कृत होते तीच ग्रामीण कथा किंवा कादंबरी वाटते. तिच्यातील सर्वच घटक तेथील शेतीनिष्ठ संस्कृतीशी प्रत्यक्षाप्रत्यक्ष संबंधित असावेत अशी आपली कळत-नकळत अपेक्षा असते. ग्रामीण कथा म्हणजे ग्रामीण बहुजनांची कथा अशी ती असावी. शेतीनिष्ठ संस्कृतीच्या परिणामातून निर्माण झालेले दारिद्र्य, अज्ञान, निसर्गप्रेम, मातीचे प्रेम, जातिव्यवस्था, बलुतेदारी, पारंपारिक निष्ठा, समजुती इत्यादी विशेषच तिच्यातून आविष्कृत व्हावेत अशी आपली कळतनकळत अपेक्षा आजवरच्या मराठी साहित्याने करून ठेवली आहे.''[१५]

यादव यांनी सांगितलेले मत ग्राह्य असेच आहे. भारतीय खेड्यांचा आत्मा हा शेती आणि तिच्याशी निगडीत जीवनपद्धती हा आहे. तेथील गावगाड्याची रचना हीच शेतीला केंद्रीत धरून झालेली असते. त्यामुळे तेथे जातीय ताणतणाव जाणवतात. धर्म आणि परंपरामध्ये इथला खेडूत अडकून राहिला आहे. ग्रामीण लोकांची बोलीभाषा, त्यांचा निसर्गाशी असणारा नित्य संबंध, त्यांची आर्थिक स्थिती ग्रामीण साहित्यात येत असते. अशाप्रकारे ग्रामीण साहित्य, प्रादेशिक साहित्य यांची संकल्पना, स्वरूप स्पष्ट करता येते.

## मराठी ग्रामीण कादंबरीची वाटचाल :

मराठी ग्रामीण कादंबरीच्या वाटचालीचा विचार करताना प्रथम म. फुले यांच्या 'शेतकऱ्यांचा असूड' (१८८३) चा उल्लेख करावा लागेल. ग्रामीण जीवनाच्या चित्रणाला पहिला स्पर्श म. फुलेंनी मराठी साहित्यात केला. म्हणूनच आनंद यादव त्यांना 'आधुनिक मराठी साहित्याचे आद्य जनक' म्हणतात. हा ग्रंथ वैचारिक स्वरूपाचा असला तरी त्यामध्ये लालित्यही आढळते. त्या ग्रंथाविषयी रवींद्र ठाकूर लिहितात, "... तो वाचताना आपण एखादी ग्रामीण कादंबरी वाचत आहोत की काय असे वाटू लागते. शेतकऱ्यांची दुःस्थिती वर्णन करताना जोतीबांची लेखणी करूणरसाचा आविष्कार करते तर त्यांच्यावर अन्याय करणाऱ्यांचा समाचार घेताना ती तीव्र उपरोधाचा अंगीकार करते."[१६]

रवींद्र ठाकूर यांचे वरील विवेचन योग्य असे आहे. कारण 'शेतकऱ्याचा असूड' मध्ये कादंबरीला आवश्यक असणारे गुणही आहेत. ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणामुळे भारतातील ग्रामोद्योग, कुटिरोद्योग कसे ढासळले याचे चित्रण म. फुलेंनी 'शेतकऱ्याचा असूड' मध्ये केले आहे. समकालीन समाजवास्तवाशी इमान राखून हे लेखन केलेले आहे. समाजजीवनाचा एक वाङ्मयीन दस्ताऐवज हे कादंबरीचे प्रमुख वैशिष्ट्य यामध्ये आहे.

ग्रामीण कादंबरीत असणारे महत्त्वाचे घटक म्हणजे शेती, शेतकरी, त्यांचे दारिद्र्यमय जीवन इ. घटकांचे अतिशय वास्तव असे चित्रण म. फुले यांनी केले आहे. शेतकऱ्यांच्या हिताची तळमळ लेखकास असलेली दिसते. म्हणून ते काही उपायही सुचवितात. फुले यांनी फक्त भट-ब्राह्मण यांच्यावरच लेखणीने हल्ले चढविले नाहीत तर शेतकऱ्यांच्या दोषांवरही बोट ठेवले आहे. रीण काढून सण साजरा करणे त्यांना आवडत नाही. त्यांच्या लेखन शैलीमध्ये आक्रमकपणा, उपहास, उपरोध जागोजागी व्यक्त झाला आहे. ब्रिटिश सरकारबद्दल शेलकी अशी विशेषणे त्यांनी वापरली आहेत. म्हणी व वाक्प्रचारांचाही वापर आढळतो.

या ग्रंथाच्या गद्यशैलीविषयी आनंद यादव म्हणतात, "'शेतकऱ्याचा असूड' मधील गद्यरचना तर निबंधापेक्षा बखरीच्या प्रकृतीला जवळची वाटते. या पुस्तकात सत्याचे तार्किक पद्धतीने विवरण करीत-करीत ते सत्य पटवून देण्याच्या विदग्ध नैबंधिक पद्धतीपेक्षा स्वतःच्या मनाला अगोदरच पटलेले व्यापक सत्य फक्त अनुकूल उदाहरणे देऊन, उपरोध-उपहासाच्या वापराने रोचक करून, प्रभावी शब्दचित्रे रेखाटून, प्रसंगी भावनात्मक आवाहन करून पुन्हा पुन्हा वेगवेगळ्या पद्धतीने आविष्कृत करून वाचकाच्या मनावर खोलखोल बिंबवत जाणे, ही

त्यांच्या गद्यलेखनाची प्रकृती बखरीला अतिशय जवळची आहे.''[१७] इथे यादव यांना या ग्रंथाचे लेखन बखरीला जवळचे वाटते. आपल्या मनाला पटलेला विचार, ते सत्य वाचकांवर बिंबविण्याचा प्रयत्न फुले करतात. त्यामुळे जनसामान्यावर प्रभाव पडतो. फुले यांचे साहित्य उपेक्षित राहिले असले तरी ग्रामीणतेच्या दिशेने मराठी संवेदना जागी करण्याचे काम फुले यांनी केले आहे. फुले यांनी लिहिलेले साहित्य ग्रामजीवनाशी नाते जोडते. शेतकऱ्यांच्या रांगड्या भाषेतच या ग्रंथाचे लेखन झाल्याचे दिसते.

कृष्णराव भालेकर यांची 'बळीबा पाटील' (१८८८) ही कादंबरी कालक्रमानुसार पहिली म्हणता येईल. हिचे मूळ शीर्षक 'बळीबा पाटील आणि १८७७ चा दुष्काळ' असे होते. या कादंबरीचे चार भाग केले आहेत. खेड्यातील जीवनाचे वर्णन आणि बळीबाच्या पाटीलकीचा इतिहास पहिल्या भागात येतो. दुसऱ्या भागात त्याचा व त्याच्या कुटुंबियांचा परिचय, तिसऱ्या भागात बळीबाने घेतलेल्या भाईबंदांच्या सभेचे वर्णन तर चौथ्या भागात बळीबाने जीवन सार्थकी लावण्यासंदर्भात उपदेशपर लेखन केले आहे. कादंबरीत शेतकरी जीवनाचे व शेतीचे वर्णन काही प्रमाणात येते. शेतकरी कुलकर्ण्यांकडून कसा लुबाडला जातो. त्यातून तत्कालीन ग्रामव्यवस्थेतील शेतकऱ्यांच्या अवस्थेचे वर्णन येते.

बळीबा हा सर्वांना मायेने जवळ घेणारा आदर्श माणूस आहे. तो जातिभेद मानत नाही. त्याच्यावर म. फुले यांच्या विचारसरणीचा प्रभाव दिसतो. शेतकऱ्यांची दुःखे दूर करण्यासाठी जे विचार मांडले आहेत ते पात्रे, संवाद, प्रसंग व ग्रामीण पार्श्वभूमी वापरून हेतूप्रधान मानून लिहिलेली ही कादंबरी आहे, असे स्वतः संपादक रायकरांनी म्हटले आहे. या मजकुराचा ऐवज कादंबरीएवढा नसल्यामुळे ही कादंबरी मानता येणार नाही. तो मान धनुर्धारी ऊर्फ रा. वि. टिकेकर यांच्या 'पिराजी पाटील' (१९०३) या कादंबरीला जातो. प्रथम या कादंबरीकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसते. खेड्याचे व शेतकरी कुणब्याच्या हालाखीचे चित्र महाराष्ट्रासमोर मांडावे हा लेखकाचा उद्देश दिसतो.

'पिराजी पाटील' ही कादंबरी ग्रामीण वास्तवाशी सच्चे इमान राखते. धनुर्धारींनी ब्राह्मणांच्या स्वार्थी व क्षुद्र प्रवृत्तींचे परखड दर्शन घडविले आहे. त्यामुळे तिची म्हणावी अशी दखल समीक्षकांनी घेतली नाही. या कादंबरीविषयी आनंद यादव म्हणतात, ''पिराजी पाटीलच आपली हकीकत सांगत असल्यामुळे यात अनेक गोष्टी आपसूक साधल्या आहेत. पिराजी पाटील हा स्वतः शेतकरी असल्यामुळे तत्कालीन शेतकऱ्याला कोणत्या नैसर्गिक व मानवी

आपत्तींशी तोंड द्यावे लागते याचे चित्रण आले आहे.''[१८] स्वतः शेतकरी असल्यामुळे नैसर्गिक आणि मानवी आपत्तींशी केलेला संघर्ष अनुभवातून पिराजी पाटील यास माहीत आहे. त्यामुळे खेडूत पाटील, त्याचे गणगोत, त्यांचे घरगुती संबंध, त्यांचे सावकारांशी, सरकारी नोकरांशी, खेडुतांशी आलेले संबंध चित्रित झाले आहेत. त्यांच्यात निर्माण झालेले ताणतणावही सहज टिपले आहेत. त्यामुळे तिचा काळ लक्षात घेता तिच्यातील वास्तव अतिशय महत्त्वाचे आहे.

१९२५ साली ना. वि. कुलकर्णी यांनी 'मजूर' या कादंबरीत शेतकरी - कामगारांची दशा वर्णन केली आहे. तर 'कसे दिवस जातील' (१९२५) मध्ये एका शेतकरी कुटुंबाची दुःस्थिती वर्णन केली आहे. तर 'शिपाई' (१९२५) याा कादंबरीत विधवेची जमीन मिळविण्यासाठी श्रीमंत लोक कट-कारस्थाने कसे रचतात याचे वर्णन येते. त्यांच्या 'माणिक' (१९३१) या कादंबरीत जुन्या वैभवाची धुंदी असलेल्या एका विलासी इनामदाराची कथा आहे. 'पैसा' (१९२६) या कादंबरीत शेतीचे महत्त्व स्पष्ट केले आहे. ना. वि. कुलकर्णी यांच्या सर्वच कादंबऱ्यांमधून ग्रामजीवनाचे चित्रण आले आहे. त्यांच्या लेखनामुळे पुढे दिघे, शिरूरकर, पेंडसे अशा लेखकांना प्रेरणा तसेच नवी दिशा मिळाली.

ना. सी. फडके यांनी लिहिलेल्या 'प्रतिभासाधन' (१९३१) या ग्रंथात कादंबरी लेखनविषयक काही संकेत मांडले आहेत. त्यामुळे लेखक फडके तंत्राप्रमाणे लिहिण्याचा प्रयत्न करू लागले. तरीही थोड्याफार प्रमाणात का असेना ग्रामजीवनाचे चित्रण वा. म. जोशी, वि. स. खांडेकर, मामा वरेरकर यांच्या कादंबऱ्यांत दिसते. त्यांना ग्रामजीवनावर लेखन करण्याची प्रेरणा गांधीवादातून मिळालेली आहे. १९२० पासून गांधीयुग सुरू होते. 'खेड्याकडे चला' या गांधीजींच्या संदेशामुळे अनेक लेखक ग्रामजीवनचित्रणाकडे वळले. वा. म. जोशी यांच्या 'इंदू काळे सरला भोळे' कादंबरीतील नायक गांधीवादाने भारावून जाऊन प्राध्यापकाची नोकरी सोडतो, ग्रामोद्धारासाठी खेड्यात जातो.

वि. स. खांडेकर यांच्यावर गांधीजींच्या अहिंसावादी तत्त्वज्ञानाचा संस्कार झालेला आहे. त्यांनी 'कांचनमृग' (१९३१) या कादंबरीत ग्रामसुधारणेचे विचार मांडले आहेत. परंतु त्यांचा प्रत्यक्ष ग्रामजीवनाशी संमंध येत नाही. 'दोन ध्रुव' मध्ये गरिबी आणि श्रीमंती असे दोन ध्रुव लेखकाला सांगायचे आहेत. 'उल्का' (१९३४) या कादंबरीमध्ये शेतमजूरांच्या लढ्याचे चित्रण केलेले आहे. 'दोन मने' चा नायक सत्याग्रह करण्यासाठी खेड्यात जातो. तर 'पांढरे ढग' चा नायक थोड्या दिवसांसाठी खेडेगावचे वास्तव समजून घेण्यासाठी खेड्यात जातो.

'क्रौंचवध' ची नायिका खेड्यातले जीवन पाहण्यास जाते. परंतु हे सर्व वरवर जाणवतं. प्रत्यक्ष कुठेही ग्रामसुधारणा करण्याऐवजी त्यावर फक्त गप्पा मारलेल्या आहेत. खांडेकरांनी प्रणयप्रसंग आणि कथानकाची गुंतागुंत यांना अधिक प्राधान्य दिले आहे.

१९४१ साली भा. वि. वरेरकरांनी 'फाटकी वाकळ' आणि 'मी - रामजोशी' या कादंबऱ्या लिहिल्या. या कादंबऱ्यावरही ग्रामवादाचा प्रभाव दिसतो. 'गोदू गोखले', 'सात लाखातील एक' या कादंबऱ्यातूनही अनुक्रमे कोकणी लोकस्थितीचे आणि खेड्यातील वेगळ्या प्रश्नांचे चित्रण केले आहे. वा. म. जोशी, वि. स. खांडेकर या तीनही लेखकांच्या कादंबऱ्यामध्ये गांधीवाद खऱ्या अर्थाने रूजलाच नाही. ग्रामजीवनाचे चित्रण झाले ते वरवरचे आहे. अस्सल ग्रामीण वास्तवाला हे लेखक स्पर्श करू शकले नाहीत. १९३५ ला लिहिलेली साने गुरूजी यांची 'श्यामची आई' ही कादंबरी मात्र यापेक्षा वेगळी आहे. यामध्ये सुट्या सुट्या कथा आहेत परंतु त्या एकमेकांत गुंतलेल्या आहेत म्हणून ती एक कादंबरीच वाटते. 'गोड शेवट' (१९४३) मध्ये साने गुरूजींनी खानदेशातील एका गावचे चित्र रेखाटले आहे. तसेच ग. रा. वाळिंबे यांच्या 'मोहित्यांची मंजुळा', 'खरा उद्धार', 'साखरगोटी', 'प्रमिलाबेन', 'गजाभाऊ' या कादंबऱ्यातून ग्रामीण जनतेचा उद्धार व्हावा ही तळमळ आहे. वि. वा. हडप यांच्या 'झाकली मूठ', 'गौरी शंकर', 'पारिजातकाची फुले' कादंबरींमधून ग्रामसमस्यांचे चित्रण येते. तसेच रा. श. पाटील यांची 'सीता,' ना. ह. आपटे यांची 'पहाटेपूर्वीचा काळोख', दा. न. शिखरेंची 'आईची कृपा' या कादंबऱ्यासुद्धा ग्रामीणतेचा स्पर्श झालेल्या आहेत.

र. वा. दिघे यांनी ग्रामीण जीवनचित्रण करणाऱ्या अनेक कादंबऱ्या लिहिल्या. १९३९ ला 'पाणकळा' ही कादंबरी लिहिली. या कादंबरीचे कथानक गुंतागुंतीचे आणि उत्कंठा वाढविणारे आहे. निसर्गवर्णन, रांगडे प्रणयचित्रण, बोध देणे अशी वैशिष्ट्ये या कादंबरीत आढळतात. रम्य निसर्गचित्रण व ग्रामीण जीवनाची पार्श्वभूमी या कादंबरीला आहे. ग्रामजीवनाकडे पाहण्याचा लेखकाचा आदर्शवादी दृष्टिकोन आहे. त्यामुळे काही मर्यादा जाणवतात.

र. वा. दिघे यांची 'सराई' (१९४३) ही कादंबरी सर्वांत लोकप्रिय आहे. रानसई या निसर्गरम्य खेड्याचे चित्रण या कादंबरीत येते. शेती, सामाजिक रीतीरिवाज, भाषा, सांस्कृतिक जीवन इ. तून रानसईचे ग्रामजीवन कादंबरीत येते. 'आई आहे शेतात' (१९५६) ही कादंबरी सुद्धा ग्रामीण जीवनानुभव सांगावेत म्हणून लिहिलेली आहे. प्रेमकथेवर जास्त भर न देता

जमीनदार आणि कुळातील संघर्ष, विभक्त कुटुंबपद्धती, ग्रामव्यवस्था यांवर जास्त भर दिला आहे. ग्रामजीवनाचे अत्यंत वास्तव चित्र या कादंबरीने रेखाटले. यानंतर दिघे यांनी 'पड रे पाण्या' (१९५८) या कादंबरीत शेतकऱ्यास केंद्रस्थानी ठेवून निसर्ग आणि मानव यांच्यातील संघर्ष चित्रित केला आहे. 'कार्तिकी' (१९६६) या कादंबरीत दिघ्यांनी ग्रामीण जीवनातील अस्पृश्यतेची समस्या मांडली आहे. 'सोनकी' कादंबरीत सह्याद्रीतील ठाकुरांचे आणि मध्य भारतातील गोंड आदिवासींचे जीवन रेखाटले आहे.

दिघे यांच्या कादंबऱ्यांविषयी आनंद यादव म्हणतात, "... दिघ्यांच्या 'पाणकळा', 'सराई', 'आई आहे शेतात', 'पड रे पाण्या', 'कार्तिकी' या महत्त्वाच्या ग्रामीण कादंबऱ्या वाचत असताना त्यांचा अर्धाअधिक भाग ग्रामीण वास्तव दर्शन घडविणाराच वाटतो आणि कादंबऱ्यांचा समग्र परिणाम कालांतराने मनात जो शिल्लक राहिलेला असतो तो त्यांच्यातील प्रदीर्घ ग्रामीण समाजजीवनाचाच असतो हे विसरता येत नाही."[१९] यादव यांचे विधान योग्य असेच आहे. कारण र. वा. दिघे यांनी सर्वच कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनानुभव समर्थपणे चित्रित केला आहे. या कादंबऱ्या मानवी जाणिवेशी नाते जोडणाऱ्या आहेत. तसेच काही वेळा रोमँटिकही होतात. पुढील काळात दिघे यांच्या कादंबऱ्यामुळे ग्रामजीवनचित्रणाच्या शक्यता रूंदावल्या हे सत्य आहे.

र. वा. दिघे यांच्यामुळे ग. ल. ठोकळ यांना लेखनाची प्रेरणा मिळाली. 'गावगुंड' ही ठोकळ यांची कादंबरी लोकप्रिय ठरली. तिने 'सराई' च्या वातावरणाचा फायदा घेतला. यातील वातावरण थोडे रांगडे आणि पांढरपेशे आहे. या कादंबरीत फडके तंत्राचा अवलंब केला आहे. 'गावगुंड' (१९४६) ही गुणाजी आणि जयवंत या दोन भावांची रोमांचक कादंबरी आहे. १९४२ चे आंदोलन, प्रतिसरकारची स्थापना, भूमिगतांच्या चळवळी, राजकीय अंदाधुंदी, दरोडेखोरी अशा घटनांची ही कादंबरी आहे. जयवंत - लीला यांचा प्रणयप्रसंग, जयवंतच्या बसला अडविणारी गुणाजीची टोळी, गुणाजीला पकडण्यासाठी फौजदाराने वापरलेल्या युक्त्या असे काहीसे कादंबरीचे कथानक आहे. कथानकात नाट्यात्मकता आणण्यासाठी विरोधी स्वभावाच्या जोड्या निर्माण केल्या आहेत. ही कादंबरी मध्यमवर्गीय जीवनचित्रणाला कंटाळलेल्या वाचकाला रूचिपालटाचा आनंद देऊ शकली. पुढे त्यांची 'ठिणगी' ही कादंबरी तसेच 'टेंभा' ही आत्मचरित्रात्मक कादंबरीही प्रसिद्ध झाली. शुद्ध मनोरंजन हाच त्यांच्या लेखनाचा उद्देश जाणवतो. मराठी ग्रामीण कादंबऱ्यात 'गावगुंड' ला महत्त्व आहे. तशाच मर्यादाही आहेत. १९४४ साली बी. रघुनाथांनी 'बाबू दडके' ही कादंबरी

लिहिली. देशकार्यासाठी स्वतःला वाहून घेणारा तरूण नायक यामध्ये आहे. 'आडगावचे चौधरी' (१९५४) मध्ये मराठवाड्यातल्या अनेक पिढ्यांची कहाणी येते. 'म्हणे लढाई संपली' (१९४६) मध्ये युद्धकाळातील टंचाईच्या परिस्थितीत सामान्य माणूस कसा शोषणाचं भक्ष्य बनत होता याचे चित्र येते.

१९४३ साली मर्ढेकरांनी 'तांबडी माती' ह्या कादंबरीत युद्धकाळातील ग्रामीण वातावरणच रेखाटले आहे. शिवा, कोंडिबासारखी सामान्य माणसेच देशहितासाठी त्याग करतात. त्यांच्या संसाराची वाताहत होते. 'पाणी' (१९४८) या कादंबरीत दुसरे महायुद्ध आणि धरण बांधण्याची योजना यामुळे शेतकऱ्यांवर होणारे अनिष्ठ परिणाम चित्रित केले आहेत. यामध्ये तीन पिढ्यांची कहाणी येते. वि. द. चिंदरकर यांनी 'महापूर' (१९४२) ही कादंबरी लिहिली. तिचे उपशीर्षक 'दक्षिण कोकणातील एका खेड्यातील काही दृश्ये' असे आहे. महादेव ठाकूर मुंबईतील वकीली सोडून ग्रामोद्धार करण्यासाठी खेड्यात येतात. ग्रामीण समस्येच्या पार्श्वभूमीवर दोन पिढ्यातील वैचारिक मतभेद चिंदरकर रेखाटतात. यामध्ये दलितांचे जीवनचित्रण आले आहे. अर्जुन हा दलित समाजाचा प्रतिनिधी आहे. यातील सर्वच व्यक्तिरेखा उठावदार आहेत.

१९४६ ला ना. के. महाजन यांची 'किसान' ही कादंबरी प्रसिद्ध झाली. ही एका गरीब शेतकऱ्याची कुटुंबकथा आहे. म. भा. भोसले यांच्या 'समरांगण' (१९४१) मध्ये वडील आणि मुलगा यांच्यातील संघर्ष आहे. भोसलेंच्या 'उघड्या जगात' (१९४७) या कादंबरीमध्ये ग्रामजीवनाचे जवळून चित्रण येते. 'एका आईची लेकरं' (१९५०) या कादंबरीत कुटुंबातील एका आईची लेकरं कितीही भांडली तरी ती शेवटी एकत्र येतात याचे चित्रण येते. 'घसरगुंडी' या कादंबरीमध्ये वाईट संगतीमुळे मार्ग चुकलेल्या एका ग्रामीण विद्यार्थ्याची कथा आहे.

१९४० ची वि. ल. बर्वे यांची 'मुचकुंद दरी' ही कादंबरी तळकोकणच्या जीवनाचे चित्रण करते. न. चिं. केळकर यांची 'कोकणचा पोर' (१९४२) ही कादंबरी एका अनाथ परंतु कर्तबगार मुलाची कथा आहे. वि. वि. बोकील यांच्या 'आबा' या कादंबरीवर गांधीवादाची छाया आहे. तर 'तू तिथं मी' या कादंबरीत बोकील ग्रामीण जीवनातील वात्सल्य चित्रित करतात. वि. वा. शिरवाडकर यांची 'वैष्णव' (१९४६) ही कादंबरी गांधीवादातून लिहिलेली आहे. द. र. कवठेकर यांच्या 'अपुरा डाव', 'रेशमाच्या गाठी', 'आभाळाची सावली' या कादंबऱ्यातूनही ग्रामजीवनाचे चित्रण आले आहे. रघुवीर सामंत यांची 'आम्ही खेडवळ

माणसं' ही बाळबोध ग्रामीण कथा आहे. तर खेडे कसे असावे हे सांगण्यासाठी भा. द. खेर यांनी 'खेड्यातील राम' ही कादंबरी लिहिली.

१९४५ च्या सुमारास काही लेखकांना मार्क्सवादातून लेखनासाठी प्रेरणा मिळाली. त्यामुळे ते आदिवासींच्या जीवनचित्रणाकडे वळताना दिसतात. त्यामध्ये शं. रा. भिसे यांची 'जंगलातील छाया' (१९४५) ही कादंबरी भिल्लांच्या हालाखीचे जीवन चित्रित करते. श्रीराम अत्तरदे यांनी 'सावलीच्या उन्हात' (१९४६) या कादंबरीत आदिवासींनी लाल बावट्याखाली एकत्र आले पाहिजे असा संदेश दिला आहे. प. त्रि. सहस्त्रबुद्धे यांची 'पहिली सलामी' ही याच आशयाची कादंबरी आहे. तर त्यांच्या 'प्रहार' मध्ये यंत्रयुगामुळे आदिवासी जीवनात झालेले बदल चित्रित केले आहेत. वि. वा. हडप यांनी 'अन्नदाता उपाशी' मध्ये गरीब शेतकरीसुद्धा जुलमी जमिनदाराचा खून करू शकतो हे दाखविले आहे. पुढे हडपांनी 'गोदाराणी' (१९४७) कादंबरीमध्ये शूर वारली शेतकरी कसे लढा देतात याचे चित्रण केले. वि. म. भुस्कुटे यांची 'दासू' ही कादंबरी शेतकरी आणि कामगार चळवळीचे चित्रण करते. वा. ब. कर्णिक यांची 'वाडगीण' (१९५१) ही कादंबरी पर्ल बर्कच्या 'द मदर' या कादंबरीचे रूपांतर आहे. तरीही ती स्वतंत्र असल्यासारकी वाटते. आदिवासी समाजांच्या व्यथा-वेदनांचे अत्यंत वास्तवदर्शी चित्रण कर्णिकांनी केले आहे. यामधील मायाची ही ठाणे जिल्ह्यातील वारली आदीवासींच्या कुटुंब कहाण्यांचे प्रतिनिधित्व करते. तिचा नवरा संसाराला कंटाळून एके दिवशी निघून जातो. नवरा कधीतरी परत येईल अशी तिला आशा वाटते. मात्र एक दिवस ती एका कारकुनाच्या वासनेची शिकार बनते. नवऱ्याचा पत्ता तिला माहीत नाही. तो कुठेतरी सावकाराकडे काम करतो असे खोटेच सांगून ती स्वतःचे संरक्षण करू पाहते. तिच्यावर एवढी संकटे येतात की शेवटी ती आत्महत्या करते. या कादंबरीत एक वेगळेच जीवनदर्शन घडविले आहे.

विभावरी शिखरकरांनी १९५० ला 'बळी' ही एक वेगळीच कादंबरी लिहून मराठी वाचकांचे लक्ष वेधले. गुन्हेगार म्हणून मानल्या गेलेल्या मांग गारूडी समाजाच्या जीवनावर आधारित ही कादंबरी आहे. हे समाज जीवन लेखिकेने जवळून पाहिले आहे. त्यांच्यात ही गुन्हेगारी प्रवृत्ती का निर्माण होते याचा त्या शोध घेतात. दलित जीवनाचं चित्रण करणारी ही कादंबरी असली तरी यातील व्यक्तिरेखा आणि जीवनचित्रण ग्रामीणच आहे. 'बळी' चा नायक आबा हा मांगगारूडी जातीत जन्माला आला आहे. या समाजातील लोक चोरी-दरोडेखोरी करीत, त्याशिवाय त्यांना गत्यंतर नव्हते. त्यामुळे त्यांना तारेच्या कुंपनात टाकले होते. जनावरांचे जीणे ते जगत असत. या आबावर गांधी बोर्डींगमध्ये गांधीवादाचे संस्कार होतात.

तो आपली जात विसरू पाहतो परंतु त्याचा समाज त्याला ती विसरू देत नाही. पुढे तो चळवळीत सामील होतो. आपल्या समाजबंधूना चोरी-दरोडेखोरी करू न देण्याचा तो **प्रयत्न** करतो मात्र त्याचा समाजच आबाला शत्रू समजतो. आपल्याच समाजबांधवाकडून त्यास मारले जाते.

'बळी' च्या संदर्भात कुसुमावती देशपांडे लिहितात, "१९५० च्या आसपास दोन-तीन वर्षात मराठी कादंबरीत नवचैतन्य व नवी जाणीव दिसू लागली आहे. या नव्या जाणिवेचा स्पष्ट आविष्कार ज्यांत होतो त्यापैकी 'बळी' ही एक अग्रगण्य आहे."२० हे विधान सत्य असेच आहे. विभावरींनी वास्तव जीवनाचा एक वेगळाच आविष्कार या कादंबरीत केला आहे. मराठी ग्रामीण कादंबरीच्या क्षेत्रात 'बळी' ही कादंबरी मैलाचा दगड ठरली. या कादंबरीने मांग-गारूडी समाजाच्या प्रश्नाला वाचा फोडण्याचे सामाजिक कार्य केले आहे. शिरूरकरांच्या या कादंबरीस वैचारिकता लाभली आहे. १९५० ला बा. भ. बोरकर यांची 'भावीण' ही कादंबरी प्रादेशिकता घेऊन येते. यातील भाविणीची जीवनकहाणी गोव्याच्या पार्श्वभूमीवर आहे. शांता शेळके यांच्या 'विझती ज्योत', 'ओढ' या कादंबऱ्यांमध्ये ग्रामीण भागातील कोष्टी समाजाचे जीवनचित्रण आहे. आणि 'मायेचा पाझर' मध्ये बापू-मंजूळा यांच्या प्रेमकथेतून खेड्यातल्या माणसाचे सच्चेपण व्यक्त होते.

१९५० नंतर प्रादेशिक चित्रणास बहर आल्याचे दिसते. त्यामध्ये श्री. ना. पेंडसे हे सुरूवातीचे लेखक होत, त्यांनी 'एल्गार' (१९४९), 'हद्दपार' (१९५०), 'गारंबीचा बापू' (१९५२), 'हत्या' (१९५४), 'कलंदर' (१९५९), 'रथचक्र' (१९६२) इ. कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये कोकणचा निसर्गरम्य प्रदेश तेथील मानवी जीवनासह चित्रित झाला आहे. 'एल्गार' कादंबरीचे कथानक साखरपेंडी या खेड्यात घडते. ही रघू आणि कादर यांची प्रेमकथा आहे. रघू ब्राह्मण तर कादर मुसलमान यांची सच्ची दोस्ती आहे. राजकीय घटनांचे पडसाद या साखरपेंडीवर पडताच कथेला वेगळे वळण मिळते. कादरला वेगळी वागणूक दिली जाते म्हणून तो पाकिस्तानचा समर्थक बनतो. परंतु रघूला वाटते की हा जातीवर गेला. कादर सुरे आयात करतो म्हणून त्याचे घर पेटविले जाते. तेव्हा रघू त्यांना आश्रय देतो, घर विझवतो. शेवट सुखद केला असला तरी हे सामाजिक वास्तव नाही हेही तितकेच खरे आहे.

'हद्दपार' कादंबरीत राजेमास्तराने घराण्याच्या विरोधात मास्तरकी स्वीकारली आहे. जुने वैभव आता राहिले नाही तरीही वडिलांना मुलाचे वर्तन आवडत नाही. मुलाने **ब्राह्मण**

असूनही पाणक्याची मुलगी घरात आणल्याने वडील कोयती उराशी कवटाळून आत्महत्या करतात. राजेमास्तर मुलांवर आईसारखे प्रेम करतात. परंतु बंडा आबाजीसारख्या ताठर व्यक्तीमुळे तसेच स्वतःच्या स्वाभिमानी स्वभावामुळे ते राजीनामा देतात. श्री. ना. पेंडसेंना 'गारंबीच्या बापू' मुळे खूप लोकप्रियता मिळाली. ही कादंबरी खूपच रंजनपर बनली आहे. यातील अफाट बापू हा यशोदा हिचा मुलगा आहे. आण्णा खोतापासून तो झालेला आहे. यशोदाचा नवरा विठोबा नपुंसक आहे. विठोबा बापूचा सांभाळ करतो. बापूला जेव्हा राधाची भेट होते तेव्हा त्याचे कर्तृत्व बहरू लागते. ही राधा हॉटेलवाल्या रावजीची पत्नी आहे. तिला बापूकडून प्रेम मिळते. तो सुपारीचा व्यापार करतो, परंतु त्याचे कर्तृत्व अगदी कमी शब्दात लेखकाने मांडले आहे. त्यामुळे संपूर्ण ग्रामपरिसर साकार होत नाही. प्रादेशिकतेच्या दृष्टीने ही कादंबरी यशस्वी झाली नाही.

'हत्या' या श्री. ना. पेंडसे यांच्या कादंबरीत पौगंडावस्थेपर्यंतचा हत्या या बालकाचा जीवनप्रवास आहे. तर 'कलंदर' मध्ये पौगंडावस्थेनंतरचा प्रवास आहे. 'रथचक्र' ही पेंडसे यांची आवडती कादंबरी. यामध्ये एका अनामिकेच्या दुर्दैवाची कथा येते. संसाराची आवड नसलेल्या एका विरक्ताशी तिचा विवाह होतो. तो निघून गेल्यावर तिला अपमानाची वागणूक मिळते. श्री. ना. पेंडसे यांनी 'तुंबाडचे खोत' ही कादंबरी दोन खंडात लिहिली. त्यामध्ये तुंबाडच्या खोतांचा चार पिढ्यांचा इतिहास कादंबरीत चित्रित होतो. एकूणच श्री. ना. पेंडसे यांच्या कादंबऱ्यांमध्ये सारखपेंडी, दापोली, हर्णे, मुर्डी आंजर्ले परिसरातील कोकणचा निसर्गरम्य प्रदेश येतो. म्हणूनच त्यांना प्रादेशिक कादंबरीकार म्हणून ओळखले जाते. मात्र त्यांच्या कादंबऱ्यांची व्याप्ती कौटुंबिकतेच्या पलीकडे जात नाही.

गो. नी. दांडेकर हे लेखक श्री. ना. पेंडसे यांच्या बरोबरीने लेखन करणारे आहेत. त्यांनी 'पडघवली', 'पवनाकाठचा धोंडी', 'शितू' 'पूर्णामायची लेकरं', 'माचीवरला बुधा', 'जैत रे जैत','रानभुली', 'वाघरू' अशा काही प्रादेशिक स्वरूपाच्या कादंबऱ्या लिहिल्या. दांडेकरांची भारतीय संस्कृतीच्या मूल्यांवर खूप श्रद्धा आहे. ही मूल्ये ढासळताना होणारी व्यथा त्यांच्या लेखनात जाणवते.

'पवनाकाठचा धोंडी' मध्ये धोंडीची व्यक्तिरेखा उठावदार आहे. आपल्या परंपराविषयी त्याला आस्था आहे. जग बदलले तरी तो बदलायला तयार नाही. त्याचा स्वभाव थोडा तऱ्हेवाईक आहे. कोंडी ही धोंडीच्या विरोधी उभी केलेली व्यक्तिरेखा आहे. परंतु कादंबरीचे चित्रण एकांगी बनले आहे. त्यामुळे ग्रामजीवन पुरेशा प्रमाणात व्यक्त होत नाही.

'शितू' मध्ये दांडेकर महाराष्ट्रातील ग्रामीण जीवन चित्रित करतात. या कादंबरीला कोकणची पार्श्वभूमी आहे. 'पूर्णामायची लेकरं' मधून वऱ्हाडी लोकजीवन चित्रित झाले आहे. ही लेकरं भोळी, सरळ स्वभावाची आहेत. ते सर्वजण रूढी-परंपरा पाळतात. त्यांची मानसिकता दांडेकरांनी अचूकपणे व्यक्त केली आहे. 'माचीवरला बुधा' ही कादंबरी लेखकाच्या निसर्गवेडातून लिहिली गेली आहे. यातील बुधाने बराच काळ शेतजमिनीत घालविला आहे. पुढे तो मुंबईला जातो परंतु माचीवरल्या मातीचे प्रेम त्याला खेचून परत आणते. थकला तरी तो काळ्या आईची सेवा करतो. बुधाच्या रूपाने निसर्गाशी तनमनाने रममाण, एकरूप होणारा माणूस घडविण्याचा लेखकाचा प्रयत्न दिसतो. त्यात त्यांना काही प्रमाणात यश मिळाले.

'जैत रे जैत' (१९६५) या कादंबरीमध्ये ठाकर या वन्य जमातीचे जन जीवन चित्रित झाले आहे. यामध्ये नाग्या आणि चिंधी यांची प्रेमकथा आली आहे. त्यांची म्हणून एक वेगळी संस्कृती आहे. वन, वनदेवता, धर्मविषयक कल्पना यांनी त्यांचे जीवन बांधलेले आहे. 'रानभुली' ची नायिका मनी ही निसर्गकन्याच वाटते. ती खूप धाडसी असल्यामुळे गडावर सर्वत्र निर्भयपणे हिंडते. लग्न झाल्यावर मुंबईला गेल्यावर मात्र ती भांबावून जाते. ती मनाने गडावरच असते. एक दिवस ती गडावर निघून जाते. तिच्या व्यक्तिरेखेत आदिमातेचे रंग आहेत. 'वाघरू' ही एका वाघराच्या निमित्ताने राजगडच्या मावळ परिसरात घडलेली कुटुंबकथा आहे. या कादंबरीत बोलीभाषेचा वापर वैशिष्ट्यपूर्ण केला आहे. तेथील परिसराचे वर्णन जिवंत झाले आहे. सर्व कादंबऱ्यांचा विचार करता दांडेकरांचं अनुभव घेणं अथवा तो व्यक्त करणं हे भावनाशील आहे. परंपरेतच ते अडकून राहू इच्छितात. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांना पुरेशी खोली लाभली नाही. तरीही त्यांच्या लोकप्रियतेचे मर्म सामान्य माणसांवर होणाऱ्या भावनात्मक परिणामात आहे.

बिनीच्या नवकथाकारातील व्यंकटेश माडगूळकर यांनीही ग्रामीण कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'पुढचं पाऊल' (१९५०) ही त्यांची पहिली कादंबरी होय. यामध्ये एका दलित कलावंताची कथा येते. वाईट स्त्रीच्या नादी लागल्याने किसना या कलावंताची आणि त्याच्या कुटुंबाची दुर्दशा होते. तरीही तो जीवनामध्ये न डगमगता उभा राहतो हेच त्याचे पुढचे पाऊल होय. माडगूळकरांच्या 'बनगरवाडी' (१९५५) या कादंबरीने मराठी ग्रामीण कादंबरीत एक वेगळेच स्थान निर्माण केले. निसर्गाच्या आश्रयाने राहणाऱ्या मानवसमुहाचे दर्शन 'बनगरवाडी'त घडते. त्यांनी या कादंबरीपूर्वीही माणदेश समर्थपणे चित्रित केला त्यामुळेच माणदेशचे लेखक म्हणून त्यांना ओळखले जाते. 'बनगरवाडी' या कादंबरीचा विचार रूढ

पद्धतीने करता येत नाही. कारण येथे नायक-नायिका, खलनायक, कथानक, पार्श्वभूमी असे काहीच नाही. इथे संपूर्ण 'बनगरवाडी'लाच नायकत्व लाभले आहे. जेव्हा दुष्काळ पडतो तेव्हा येथील धनगरांना प्रश्न पडतो की, आमच्या मेंढरांनी खावं काय? आणि आम्ही जगावं कसं? म्हणजेच इथे निसर्गावरच सर्व जीवन अवलंबून आहे. संपूर्ण गावगाडा समुहरूपाने दिसतो. येथील लोक सण, उत्सव, पारंपारिक विधी श्रद्धेने करतात.

व्यंकटेश माडगूळकर यांनी नंतर 'वावटळ, 'कोवळे दिवस', 'करूणाष्टक' या आत्मचरित्रात्मक कादंबऱ्या लिहिल्या. 'वावटळ' मध्ये गांधीवादामुळे ग्रामीण भागात ब्राह्मण समाजावर जे गंडांतर कोसळले त्याचे चित्रण येते. माडगूळकरांची 'बनगरवाडी' कादंबरी मराठी ग्रामीण कादंबरीच्या इतिहासात मैलाचा दगड ठरलेली कादंबरी होय. १९६० नंतर मराठी ग्रामीण कादंबरी नवे अनुभव सांगू लागली. दा. गो. बोरसे यांनी 'अजिंठ्याचे लेणे-जीभाऊ', के. नारखेडे यांची 'अंजनी', ना. रा. शेंडे यांची 'काजळी रात्र', दुर्गा भागवत यांची 'महानदीच्या तीरावर', ह. श्री. शेणोलीकर यांची 'मायणीची मंजुळा' या काही ग्रामीण कादंबऱ्यांचा उल्लेख करता येईल.

अण्णाभाऊ साठे यांना जरी दलित लेखक म्हणून आपण ओळखत असलो तरी त्यांच्या कादंबऱ्यातील जीवनदर्शन हे ग्रामीणच आहे. त्यांनी अनेक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यामध्ये 'चित्रा', 'वैजयंता', 'फकिरा', 'माकडीचा माळ', 'आवडी', 'वैर', 'रानगंगा', 'पाझर', 'मास्तर', 'वारणेचा वाघ', तसेच 'चंदन', 'अलगूज', 'केवड्याचं कणीस' आणि 'चिखलातील कमळ' अशा भरपूर कादंबऱ्या लिहिल्या. 'फकिरा' (१९५९) ही आण्णाभाऊंची सर्वात लोकप्रिय कादंबरी होय. इंग्रजी अमदानीत वारणेच्या खोऱ्यात फकिराने केलेली बंडखोरी, राणोजीचा पराक्रम याची इतिहासात दखल घेतली गेली नाही. मात्र त्या व्यक्ती लोकमानसात जिवंत होत्या. ग्रामीण भागातील या पराक्रमाच्या लोककथा हाच येथे कादंबरीचा विषय आहे. 'वैर' या कादंबरीत अन्याया विरूद्ध केलेला संघर्ष चित्रित होतो. येथे दोन घराण्यातील पिढ्यांपिढ्याचे वैर आहे.

१९६० ला उद्धव शेळके यांची 'धग' ही ग्रामीण कादंबरीत मैलाचा दगड ठरली. ग्रामीण वास्तवाला अगदी जवळून स्पर्श या कांदबरीने केला. कौतिक या शिंपी कुटुंबातल्या सामान्य स्त्रीने जगण्यासाठी केलेल्या धडपडीची ही कथा आहे. तिची सारी चिंता पोटापाण्याशी निगडीत आहे. तिचा नवरा महादेव हा अगदी सामान्य आहे. तो जास्त कर्तृत्ववान नाही. भीमा व नामा ही त्यांची दोन मुले आहेत. कौतिक ही सामान्य असली तरी

कर्तबगार आहे. कितीही कष्ट केले तरी अपयशच ही कौतिकची नियती आहे. साध्या सरळ निवेदनातून कथानक आकार घेते. वाचकांचे हृदय हेलावून टाकून त्याला अस्वस्थ करण्याचे जबरदस्त सामर्थ्य या कादंबरीत आहे. कौतिकच्या जीवनव्यवहाराबरोबरच तेथील लोकांच्या रूढी परंपरा, सण, त्यांचे व्यवसाय, श्रद्धा - समजुती यांचेही दर्शन 'धग' मध्ये घडते.

ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिणाऱ्या रणजित देसाईंनीही सुरूवातीस ग्रामीण कादंबऱ्या लिहिल्या आहेत. १९५९ ला 'बारी', १९६० ला 'माझा गाव' आणि १९७९ ला 'समीधा' या कादंबऱ्यांतून ग्रामीण वास्तव रेखाटले आहे. 'बारी'मध्ये गुन्हेगार मानल्या गेलेल्या बेरड जमातीचे परंपरागत जीवन, स्थित्यंतरे, त्यांच्या भवितव्याची काळजी याचे चित्रण येते. तर 'माझा गाव' मध्ये स्वातंत्र्यापूर्वीचं खेडे उभे करण्याचा लेखकाचा प्रयत्न दिसतो. दि. बा. मोकाशी यांची 'देव चालले' आणि लक्ष्मीकांत तांबोळी यांची 'दूर गेलेले घर' या दोन्हींमध्ये मानवी मनातील श्रद्धांची मुळे शोधण्याचा प्रयत्न दिसतो.

१९६० ला शंकर पाटील यांनी कथाकार म्हणून स्थिर झाल्यावर 'टारफुला' सारखी कादंबरी लिहिली. रूढ संकेतांना झुगारून या कादंबरीचे लेखन झाले आहे. इथे व्यक्ती नायक नाही तर संपूर्ण गावच केंद्रस्थानी आहे. गाव आणि त्या गावाच्या सत्तेसाठी चाललेला संघर्ष हाच येथे केंद्रस्थानी आहे. यामध्ये तीन पिढ्यांचा संघर्ष येतो. शेवटी सर्वनाश हे माहीत असूनही माणसाला सत्तेचा मोह सुटू शकत नाही याचे चित्रण 'टारफुला' मध्ये येते. या कादंबरीविषयी नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, "...सत्ता, सत्ता-विरोध, सत्तासंघर्ष, सत्तेचे हस्तक या सगळ्याच गोष्टी, गावाचं अस्तित्व धोक्यात आणणाऱ्या ठरतात. म्हणून येथे दादा पाटलांसहित सगळेच 'टारफुला' रूप होऊन जातात. त्यामुळे मिटीमिटी डोळ्यांनी बघणारा, मूक असा गाव आणि हा सत्तेचा 'टारफुला' यांच्यात एक न दिसणारा संघर्ष निर्माण होत जातो. हेही या कादंबरीचे एक नवे परिमाण आहे."[२१]

नागनाथ कोत्तापल्ले यांचे हे मत पटते. कारण सत्तेमुळे माणूस कसाही वर्तन करीत असतो. त्यातून सर्वनाशच ओढवत असतो. हमीद दलवाई यांची 'इंधन' (१९६५) ही सामाजिक कार्यकर्त्याची कादंबरी होय, येथील मुस्लीम तरूण राष्ट्रवादी आणि पुरोगामी विचारांचा आहे. पंधरा वर्षानंतर तो गावी आलेला असतो. गावचे बदललेले रूप, हिंदू-मुस्लीम संघर्ष, बौद्ध-सवर्ण संघर्ष आणि स्वतःची असहायता असे या कादंबरीचे आशयद्रव्य आहे. तो पुरोगामी विचारांचा आहे. त्यामुळे मुस्लीमांपासून दुरावतो. तर धर्माने मुस्लीम

असल्यामुळे हिंदूही लोक त्यास जवळ करीत नाहीत. या कादंबरीने स्वातंत्र्योत्तर काळातील हिंदू-मुस्लीमांत जे तणाव निर्माण झाले होते ते अचूकपणे टिपले आहेत.

जयवंत दळवी 'महानंदा' या कादंबरीमध्ये एका भावीणीच्या मुलीची परवड चित्रित करतात. घराण्याच्या दुष्ट रूढीमुळे महानंदेची कुचंबना होते. मात्र ती आपल्या सौंदर्याने आणि अबोल प्रीतीने चटका लावून जाते. 'धर्मानंद' मध्ये कोकणी ग्रामीण वास्तवाचे चित्र दळवी उभे करतात. चिं. त्र्यं. खानोलकर यांनी 'रात्र काळी घागर काळी', 'अगोचर', 'भागधेय', 'कोंडुरा', 'पाषाणपालवी' इ. कादंबऱ्या कोकणी अनुभवांवर लिहिल्या. गुहाडोंगरांनी भरलेला कोकणचा निसर्ग आणि देवदेवतांच्या कथांनी भारलेले कोकणी समाजजीवन त्यांच्या कादंबऱ्यात येते.

मधु मंगेश कर्णिक हे ग्रामीण, दलित आणि महानगरीय झोपडपट्टी अशा तिन्ही वास्तवाचे चित्रण आपल्या कादंबऱ्यांत करतात. 'देवकी' (१९६२) ही भाविणीच्या असीम त्यागाची कहाणी आहे. कर्णिकांची 'माहीमची खाडी' (१९६९) ही कादंबरी जरी नगरीय जीवनाचं चित्रण करणारी असली तरी प्रादेशिकही ठरते. 'भाकरी आणि फूल' मध्ये महार कुटुंबातील तीन पिढ्यांच्या मानसिक स्थित्यंतराचा आलेख येतो. तर 'कातळ' मध्ये अंधश्रद्धा, दुसऱ्यांचा दुस्वास करण्याची वृत्ती याचे चित्रण येते.

रा. रं. बोराडे आणि आनंद यादव हे दोन साठोत्तरी महत्त्वाचे ग्रामीण लेखक आहेत. त्यांची कथा, कादंबरी आशय आणि भाषेच्या बाबतीत ग्रामीण संवेदनशिलतेला अतिशय जवळची आहे. बोराडे यांची 'पाचोळा' (१९७१) ही ग्रामीण बोलीभाषेत लिहिलेली मराठीतील पहिली कादंबरी आहे. यामध्ये मराठवाड्यातल्या एका खेड्यातील पारबती आणि गंगाराम या शिंपी कुटुंबाची शोकांत कहाणी आहे. यातील पारबतीचे निवेदन अगदी सरळ आहे. गरडाच्या धोतराला दंड न घातल्यानं, '... गावात दुसरी मशीन आनीन तवाच दंड घालून धोतर नेसन...' अशी इर्षा गरड बाळगतो. यातून त्यांच्या जीवनाची परवड सुरू होते. गंगारामला स्पर्धक मिळतो. मात्र बापाच्या जिद्दीला भाना बळी ठरतो. गरडापुढे 'आपुन तर काय निव्वळ पाचुळ्यावानी' याची पारबतीला जाणीव आहे. 'तानी' च्या रूपाने तिचे दुःख आणखी गहिरे बनते. एखादा जीवघेणा प्रसंग असला की तिची भूक नेहमी जागी होते. तिच्या वाटीला एक दिवस चिर जाते. यातून पारबतीच्या संसाराला गेलेल्या तड्याची सूचकता लक्षात येते. नंतर रा. रं. बोराडे यांनी 'सावट' (१९८७) आणि 'चारापाणी' (१९९०) या कादंबऱ्या लिहिल्या. त्यांचा विचार पुढे येईलच.

बोराडें यांच्या 'पाचोळा' प्रमाणे आनंद यादव यांची 'गोतावळा' (१९७१) ही कादंबरीसुद्धा वैशिष्ट्यपूर्ण ठरली. कृषि-संस्कृतीवरील यंत्रसंस्कृतीचे आक्रमण हा या कादंबरीचा विषय आहे. 'गोतावळा' मधील नारबाने पशु-पक्षांसमवेत एक वेगळेच विश्व निर्माण केले आहे. मात्र यंत्रसंस्कृतीच्या आगमनाने हे विश्व क्रमाक्रमाने उध्वस्त होत जाते. याविषयी चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, "... नारबाच्या उध्वस्त होत जाणाऱ्या जीवनातलं सारं कारूण्य व त्याच्या शोकान्त जीवनाचं आवाहन भावनात्मक अधिक आहे. नारबाच्या आत्मियतेच्या पसाऱ्याचं वर्णनही याच दृष्टीतून होणं शक्य होतं. नारबाच्या जीवनात काही असं आहे जे काव्याला जवळचं आहे. या दृष्टीनंही ही स्वगतशैली महत्वाची वाटते. भाषेचं, नारबाच्या प्रतिमांचं, (ह्या प्रतिमा प्रचूर आहेत, स्वाभाविक आहेत आणि परिसराशी जुळलेल्याही आहेत.) संवेदनांचं मराठी कादंबरीत इतक्या समृद्धतेनं प्रथमच आलेलं विलक्षण ताजं असं 'गावरानपण' नारबाच्या स्वगतामुळेच दृष्टीगोचर होतं व प्रभावी वाटतं."[२२]

बांदिवडेकर यांचे वरील विवेचन रास्त असे आहे. कारण यंत्र संस्कृतीचे आगमन होताच गोठ्यात बैलांच्या जागी ट्रॅक्टर आला. निरूपयोगी बैल, शेळ्या विकल्या जातात. काही जनावर मृत्यूमुखी पडतात. काही जनावरं पांजरपोळात तर काही कसायला विकली जातात. पैशासाठी झाडे तोडली जातात. नारबा आपलं रूप या गोतावळ्यामध्येच पहात असतो. 'गोतावळा' ने मराठी ग्रामीण कादंबरीत भर घातली हे आवर्जून म्हणता येईल. 'नटरंग' (१९८०) या कादंबरीत यादव यांनी एका तमाशा कलावंताची शोकांतिका चित्रित केली आहे. तर 'झोंबी' मध्ये शेतकऱ्याच्या मुलाने प्रतिकूल अशा परिस्थितीत शिक्षणासाठी घेतलेल्या झोंबीचे चित्रण येते. याविषयी रवींद्र ठाकुर लिहितात, "... त्यांच्या 'गोतावळा', 'नटरंग', 'झोंबी' या कादंबऱ्यांनी ग्रामीण कादंबरीच्या इतिहासात आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे एवढे निश्चितच म्हणता येईल."[२३] ठाकूरांचे हे मत पटते, कारण आनंद यादवांना शेतीविषयीचे चांगले ज्ञान आहे. तरीही काही मर्यादा जाणवतात. गोतावळा ज्या खेड्यात आहे, त्या खेड्याचे समाजजीवन, ग्रामव्यवस्था याचे चित्रण यादवांनी वगळले असे वाटते, काही मर्यादा मान्य करूनही त्यांच्या 'गोतावळा'चं स्थान निश्चितच वेगळं असं आहे.

१९७३ ची ना. धों. महानोर यांची 'गांधारी' ही कादंबरी होय. यामध्ये रझाकारी जुलुम आणि पुढाऱ्यांच्या कारवाया यात भरडलेल्या खेड्याचे चित्रण येते. चंद्रकुमार नलगे यांनी 'आगीनफूल' 'गस्त', 'देवाची साक्ष' अशा काही कादंबऱ्या लिहिल्या, 'आगीनफूल' कादंबरीमध्ये पतिव्रता सावित्री ही सासू-नणंदेचा छळ सहन करूनही घटस्फोट घेत नाही.

पतीच्या खूनाचा बदला खूनानेच घेते. असे भडक चित्रण तसेच ग्रामीण वातावरणही आहे. 'गस्त' ही एका फरारी झालेल्या दरोडेखोराच्या हृदयपरिवर्तनाची कथा आहे. लेखनाची मोठी ताकद असलेले महादेव मोरे हे पांढरपेशी विश्वाच्या कक्षेबाहेरील विषयावर लेखन करणारे लेखक आहेत. त्यांनी शेतमजूर, विडीकामगार, ड्रायव्हर-क्लिनर, वेश्या, वेश्यांचे दलाल, जोगते-जोगतिणी तसेच मांग-गारूडी, डोंबारी अशा भटक्या जमातींचे जग चित्रित केले आहे. 'रैत' मध्ये एका शेतमजूराची कथा येते. ग्रामीण भागात शिक्षण घेणे सहज शक्य होत नाही हे येथे सांगितले आहे. 'प्रवाह' मध्ये कसंतरी शिक्षण पूर्ण करून नोकरीसाठी करावी लागणारी वणवण दिसते. 'वस्ती' मध्ये मांगगारूडी, डोंबारी यांचे चित्रण आहे. 'वर आभाळ, खाली धरती' मध्ये देवदासी सोडलेल्या मुलींना वेश्या म्हणूनच कसं जगावे लागते याचे चित्रण येते, 'आडगर' मध्ये वेश्याजीवनाचे भीषण वास्तव चित्रित केले आहे.

स्वातंत्र्यानंतर औद्योगिकीकरणाचं वारं खेड्यातही आले. त्यामध्ये खेड्यात ड्रायव्हर, क्लिनर, मेस्त्री, त्यांची चालणारी अखंड भटकंती, वेश्यांकडे जाणे, मोटार दुरूस्ती करणाऱ्या व्यावसायिकांचे जग महादेव मोरे यांनी 'एकोणीसावी जात', 'पनोती', 'स्टँड', 'लाईन', या कादंबऱ्यातून चित्रित केले. जगण्यासाठी करावा लागणारा संघर्ष हेच महादेव मोरेंच्या साहित्यातील माणसांचे जीवन आहे. 'झोंबड' या कादंबरीमध्ये विडी कारखानदारांचे आपसातले संघर्ष आणि कामगारांचे होणारे हाल चित्रित होते. मोरेंनी 'रैत' आणि 'पाव्हणा' या कादंबऱ्या ग्रामीण निवेदन शैलीत लिहिल्या आहेत. शंकर खंडू पाटील यांनी 'सरपंच', 'घुंगरू', 'कुलवती', 'बेईमान' या कादंबऱ्या लिहून ग्रामीण समाजाचे दुःख मांडले. श्रीपाद काळेंनी 'रानपाणी' कादंबरीत शेतावर जीवापलीकडे प्रेम असणाऱ्या विठोबाचे चित्रण केले आहे. तसेच 'कातळावरचे पाणी', 'काजळलेले दिवस' याही काही कादंबऱ्या लिहिल्या आहेत. द. ता. भोसले सारखे ग्रामीण कथाकार, समीक्षक त्यांनीही ग्रामीण कादंबऱ्या लिहिल्या. 'मी आणि माझा बाप' (१९६९) मध्ये बाप आणि मुलगा दोघेही बेरकी आहेत. ही उत्कृष्ट ग्रामीण विनोदी कादंबरी आहे. 'इथे फुलांना मरण जन्मता' (१९८५) मध्ये रमा नावाच्या ग्रामीण तरूणीची दुर्दैवी कहाणी येते. लक्ष्मीकांत तांबोळी यांची 'दूर गेलेले घर' (१९७०) हिचाही उल्लेख करता येईल.

सुभाष भेंडेनी 'आमचे गोंय आमकां जाय' (१९७०), 'जोगीण' (१९७४) यामध्ये गोव्याचे वास्तव चित्रित केले. निसर्गवर्णने, संवाद कोकणीतून आले आहेत. 'जोगीण' च्या जीवनदर्शनास प्रादेशिकतेचा रंगगंध लाभला आहे. चंद्रकांत काकोडकरांनी 'निसर्गाकडे',

'कुणाच्या स्वातंत्र्यासाठी', 'अन्नपूर्णा', 'गोमंतका जागा हो' या कादंबऱ्यामध्ये गोव्याचे प्रादेशिक जीवन तसेच स्वातंत्र्यप्राप्तीसाठी झालेल्या चळवळी यांचे चित्रण केले आहे. तसेच बा. द. सातोस्कर यांची 'जाई', भालचंद्र मडकईकरांची 'त्रिवेणी', स. शि. देसाईंची 'इभ्रत' यांचाही उल्लेख करावा लागेल. ग. दि. माडगूळकरांच्या 'आकाशाची फळे' मध्ये माणदेशच्या एका कुंभाराची कथा येते. 'उभे धागे, आडवे धागे' ही एक त्यांची कादंबरी आहे. दि. वि. जोशींची 'जागवेला', 'सरघा', 'येरझार', बाजीराव पाटील यांची 'भंडारवाडी', पां. श्रा. गोरे यांची 'कात टाकलेली नागीण', रंगनाथ पठारेंची 'वेडी बाभळ', बापूसाहेब गावडे यांची 'दसऱ्याचं सोनं' या काही कादंबऱ्या आहेत.

रवींद्र पिंग्यांनी 'परशुरामाची सावली' मध्ये हिंदु-मुस्लीम समाजाच्या स्थित्यंतराचे दर्शन ग्रामजीवनाची पार्श्वभूमी घेऊन केले आहे. 'मातीत मिळालं मोती' मध्ये रघुनाथ पाटलांनी शेतकऱ्यांसाठी झटणाऱ्या जयदीपची कथा चित्रीत केली आहे. शंकरराव खरातांच्या 'गावाचा टिनोपाल गुरूजी' मध्ये ग्रामीण भागातील शैक्षणिक वातावरण कसे गढूळ बनते ते येते. तसेच श्रीराम कामतांची 'भीष्माचा डोंगर', माधव यादवांची 'बोरगाव', आनंद रेगेंची 'मालकीगंधा', नयना आचार्य यांची 'सश्यशामला' आणि 'रानझरी', 'साडेतीन हात', श्रीपाद जोशींची 'मी भूमिपुत्र', वामन तिरबुडे यांची 'पालापाचोळा' वि. शं. पारगावकरांची 'कालचक्र', 'अंतरिता' या काही ग्रामीण जीवन चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या आहेत. काही ग्रामीण कादंबऱ्या खूपच लोकप्रिय ठरल्या. त्यामध्ये बाबा कदमांची 'राही', 'प्रलय' या कादंबऱ्या आहेत. देवदत्त पाटील यांची 'संघर्ष', 'फेरा', 'व्याध', 'सिद्धनाग' या ग्रामीण कादंबऱ्या मनोरंजनाकडे अधिक झुकलेल्या दिसतात. ग्रामीणता फक्त पार्श्वभूमी म्हणून येते. शहरी वाचकांनाही रूचिपालट असेच त्यांचे स्वरूप आहे.

१९७५ नंतर कथाकार म्हणून नाव मिळवलेले आनंद पाटील यांनी 'कागूद' आणि 'सावली' (१९८६) या कादंबऱ्या लिहिल्या. त्यामुळे यादव-बोराडे यांच्यानंतरचा एक वैशिष्ट्यपूर्ण टप्पा निर्माण केला. शेत खरेदी करताना, खरेदीखत करून घेताना शेतकऱ्यांना येणाऱ्या अनंत अडचणी 'कागूद' मध्ये सांगितल्या आहेत. ही घटना साधीच आहे परंतु यातून ग्रामीण माणसाच्या जीवनाचे अस्सल दर्शन घडते. सरकारी कर्मचारी, तलाठी हे शेतकऱ्यांना देता येईल तेवढा त्रास देऊन त्यांची आर्थिक पिळवणूकही करतात. 'सावली' मध्ये घर बांधताना येणाऱ्या अनेक अडचणी मांडल्या आहेत. हा अनुभवही अस्सल ग्रामीण आहे. सर्वजणच त्यास गोत्यात आणायला बघतात. यामध्ये माणसाच्या मनातील विकृती, त्यांचे

'कुणाच्या स्वातंत्र्यासाठी', 'अन्नपूर्णा', 'गोमंतका जागा हो' या कादंबऱ्यामध्ये गोव्याचे प्रादेशिक जीवन तसेच स्वातंत्र्यप्राप्तीसाठी झालेल्या चळवळी यांचे चित्रण केले आहे. तसेच बा. द. सातोस्कर यांची 'जाई', भालचंद्र मडकईकरांची 'त्रिवेणी', स. शि. देसाईंची 'इभ्रत' यांचाही उल्लेख करावा लागेल. ग. दि. माडगूळकरांच्या 'आकाशाची फळे' मध्ये माणदेशच्या एका कुंभाराची कथा येते. 'उभे धागे, आडवे धागे' ही एक त्यांची कादंबरी आहे. दि. वि. जोशींची 'जागवेला', 'सरघा', 'येरझार', बाजीराव पाटील यांची 'भंडारवाडी', पां. श्रा. गोरे यांची 'कात टाकलेली नागीण', रंगनाथ पठारेंची 'वेडी बाभळ', बापूसाहेब गावडे यांची 'दसऱ्याचं सोनं' या काही कादंबऱ्या आहेत.

रवींद्र पिंग्यांनी 'परशुरामाची सावली' मध्ये हिंदु-मुस्लीम समाजाच्या स्थित्यंतराचे दर्शन ग्रामजीवनाची पार्श्वभूमी घेऊन केले आहे. 'मातीत मिळालं मोती' मध्ये रघुनाथ पाटलांनी शेतकऱ्यांसाठी झटणाऱ्या जयदीपची कथा चित्रीत केली आहे. शंकरराव खरातांच्या 'गावाचा टिनोपाल गुरूजी' मध्ये ग्रामीण भागातील शैक्षणिक वातावरण कसे गढूळ बनते ते येते. तसेच श्रीराम कामतांची 'भीष्माचा डोंगर', माधव यादवांची 'बोरगाव', आनंद रेगेंची 'मालकीगंधा', नयना आचार्य यांची 'सश्यशामला' आणि 'रानझरी', 'साडेतीन हात', श्रीपाद जोशींची 'मी भूमिपुत्र', वामन तिरबुडे यांची 'पालापाचोळा' वि. शं. पारगावकरांची 'कालचक्र', 'अंतरिता' या काही ग्रामीण जीवन चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या आहेत. काही ग्रामीण कादंबऱ्या खूपच लोकप्रिय ठरल्या. त्यामध्ये बाबा कदमांची 'राही', 'प्रलय' या कादंबऱ्या आहेत. देवदत्त पाटील यांची 'संघर्ष', 'फेरा', 'व्याध', 'सिद्धनाग' या ग्रामीण कादंबऱ्या मनोरंजनाकडे अधिक झुकलेल्या दिसतात. ग्रामीणता फक्त पार्श्वभूमी म्हणून येते. शहरी वाचकांनाही रूचिपालट असेच त्यांचे स्वरूप आहे.

१९७५ नंतर कथाकार म्हणून नाव मिळवलेले आनंद पाटील यांनी 'कागूद' आणि 'सावली' (१९८६) या कादंबऱ्या लिहिल्या. त्यामुळे यादव-बोराडे यांच्यानंतरचा एक वैशिष्ट्यपूर्ण टप्पा निर्माण केला. शेत खरेदी करताना, खरेदीखत करून घेताना शेतकऱ्यांना येणाऱ्या अनंत अडचणी 'कागूद' मध्ये सांगितल्या आहेत. ही घटना साधीच आहे परंतु यातून ग्रामीण माणसाच्या जीवनाचे अस्सल दर्शन घडते. सरकारी कर्मचारी, तलाठी हे शेतकऱ्यांना देता येईल तेवढा त्रास देऊन त्यांची आर्थिक पिळवणूकही करतात. 'सावली' मध्ये घर बांधताना येणाऱ्या अनेक अडचणी मांडल्या आहेत. हा अनुभवही अस्सल ग्रामीण आहे. सर्वजणच त्यास गोत्यात आणायला बघतात. यामध्ये माणसाच्या मनातील विकृती, त्यांचे

स्वभाव याचेही चित्रण आनंद पाटील मार्मिकपणे करतात. आनंद पाटील यांना ग्रामीण जीवनाचे चांगले भान आहे.

पुरूषोत्तम बोरकर हेही एक ग्रामीण संवेदनशीलता असलेले लेखक आहेत. त्यांनी 'मेड इन इंडिया' (१९८७) ही कादंबरी लिहिली. ही कादंबरी चर्चेचाही विषय झाली. ग्रामीण भागात होणारी जीवनमूल्यांची पडझड कशी होते याचे चित्रण यामध्ये येते. वऱ्हाडी बोलीतले वाक्प्रचार, म्हणी यांचाही वापर केला आहे. अनेक व्यसनांच्या आहारी आज ग्रामीण समाज जात आहे. बेकारीचे प्रमाण वाढतच आहे. त्यामुळे शिक्षणावरील माणसांचा विश्वासही राहिला नाही. येथे पंजाबरावला वडिलांच्या दारूच्या व्यसनापायी गरीबीचं, अपमानीत जिणं जगावं लागतं. विकृतीकडे वाटचाल करणाऱ्या ग्रामीण जीवनवास्तवाचे भेदक दर्शन घडविणारी 'मेड इन इंडिया' ही एक चांगली कादंबरी आहे. 'हाल्या हाल्या दुधू दे' (१९८५) ही बाबाराव मुसळे यांची कादंबरी होय. यामध्ये एका शेतकऱ्याची शोकांतिका येते. हा शेतकरी मुलीच्या लग्नासाठी सावकाराला शेतीचे खरेदीखत लिहून देतो. मुलीलाही सुख मिळत नाही. शेवटी मुलीचा बाप सगळीकडूनच सर्वनाश होऊन मरतो. यातील घटनांचा अतिरेक झाल्यासारखा वाटतो. कादंबरीचा शेवट भडक वाटतो. वऱ्हाडी बोलीभाषेत निवेदन ही या कादंबरीची जमेची बाजू म्हणता येईल.

अशोक व्हटकर यांच्या 'मेलेलं पाणी' मध्ये ढोर समाजाचे जीवन आले आहे. त्यांच्याच 'बगाड' मध्ये ग्रामीण भागातील धर्मपरंपरेत जखडलेल्या कुटुंबाचं चित्रण येते. ग्रामीण साहित्य चळवळीतील महत्वाची व्यक्ती नागनाथ कोत्तापल्ले हे होत. त्यांनी 'उलट चालिला प्रवाह' (१९८५), 'गांधारीचे डोळे' (१९८५) या दोन कादंबऱ्या लिहिल्या. दलितांमध्ये कोणी न्यायासाठी झगडणाऱ्यावर तो समाजच विश्वास ठेवत नाही. हेच त्यांना येथे सांगायचे आहे. त्यांच्या 'गांधारीचे डोळे' मध्ये राजकारणाचे हिडीस रूप आले आहे. त्यांच्या सामाजिक जाणिवांचे बेगडी स्वरूप कोत्तापल्ले उघडकीस आणतात. जोगतिणींच्या दुःखाला वाचा फोडण्याचं काम राजन गवस यांनी केले आहे. त्यांच्या 'चौंडकं' या कादंबरीत देवदासी म्हणून सोडलेल्या सुलीचं चित्रण येते. अशी देवदासी समाजाला उपभोग्य वस्तूच वाटत असते. यामधील सुलीची व्यक्तिरेखा अगदी जिवंत अशी चित्रित झाली आहे. खेडूत अंधश्रद्धेतून सुलीच्या हाती चौंडकं येतं. 'भंडार भोग' (१९८८) मध्ये पुरूषाला देवीस सोडल्याचं चित्र येते. देवदासीपेक्षा वाईट जीणं या जोगत्यांना जगावं लागतं. स्त्रीवेश धारण करून जोगवा मागणे, आणि आयुष्यातील सर्व सुखाला पाठ फिरवावी लागते. येथील तायाप्पाचे हेच दुःख

आहे. सामाजिक जाणिव या लेखनातून स्पष्ट होते. या कादंबऱ्या वाचकास निश्चितच चिंतनप्रवृत्त करणाऱ्या आहेत.

वासुदेव मुलाटेंनी 'विषवृक्षाच्या मुळ्या' (१९८९) ही कादंबरी लिहिली. ग्रामीण भागातील निर्माण होणारी सहकार क्षेत्रे, त्याचे प्रत्यक्ष चित्र कसे आहे हेच मुलाटे या कादंबरीत मांडतात. ग्रामीण भागात सुधारणा व्हाव्यात म्हणून सहकाराचा वृक्ष लावला जातो, मात्र तो विषवृक्ष बनतो. ग्रामीण वास्तव या कादंबरीत अचूक टिपले आहे. रामचंद्र पठारे यांच्या 'पाचर' कादंबरीत ग्रामीण राजकारणी वर्गाचं चित्र येते, राजकारणी लोक प्रत्यक्ष कृतीच्या वेळी आपले खायचे दात दाखवत असतात. १९८० ला लिहिलेली विश्वास पाटील यांची 'आंबी' ही एक उल्लेखणीय कादंबरी आहे. घरंदाजपणाच्या नावाखाली मराठी कुटुंबातील एका दुदैवी मुलीला बापाच्या मतानुसार नपुसंक आतेभावाशी लग्न करावं लागतं. यातून तिच्या जीवनाची झालेली परवड विश्वास पाटील चित्रित करतात. त्यांनी 'पांगिरा' ही एक समकालीन वास्तव प्रकट करणारी कादंबरी लिहिली.

बंकट पाटील यांच्या 'मंधान' मध्ये तमाशा कलावंत स्त्रीचं पडद्यामागील आयुष्य चित्रित होते. विष्णु गुंजाळ यांच्या 'बेणं' या कादंबरीत लोकसमजुतीच्या भोवऱ्यात अडकलेल्या गरीब माणसाचं चित्रण येते. अरूण साधू यांच्या 'शापित' मध्ये दुष्काळाचे चित्रण येते. ह. मो. मराठे यांच्या 'देवाची घंटा' मध्ये दारिद्रयामुळे अगतिक झालेल्या मनाचा शोध घेतला आहे. बा. ग. केसकरांच्या 'वायटूळ' (१९८३) ग्रामीण नवतरूणाला शिक्षण घेऊनही परिस्थिती पुढे हात टेकावे लागतात याचे चित्रण येते हीच ग्रामीण तरूण पिढीची शोकांतिका आहे. काही दलित लेखकांनी ग्रामीण समाजाचं जीवन चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या लिहिल्या. त्यामध्ये जरी दलित समाजाचं जीवन असले तरी त्याचा समावेश ग्रामीणतेमध्येच होतो. माधव कोंडविलकर यांनी 'अजून उजाडायचं आहे' (१९८१) मध्ये चांभार समाजाचे जीवन चित्रित केले आहे. 'अनाथ' मध्ये शिक्षणासाठी केलेली धडपड व बेकारी यांचे चित्रण येते. 'छेद' कादंबरीत दलितामधील उचनिचता चित्रित केली आहे. 'झपाटलेला' मध्ये खेड्याचा कायापालट करणाऱ्या जिद्दी तरूणाची कथा आहे.

'झुलवा' (१९८६) या कादंबरीत उत्तम बंडू तुपेंनी जगन नावाच्या जोगतिणीची जीवन उद्ध्वस्त करणारी कथा चित्रित केली आहे. त्यांच्या 'चिपाड' (१९८९) मध्ये संतू या नवशिक्षित ग्रामीण तरूणाची मानसिक वाताहत चित्रित होते. तसेच तुपेंनी 'खुळी', 'इजाळं', 'झावळं', 'खाई' अशाही काही कादंबऱ्या लिहिल्या आहेत. शशीकांत तासगावकरांची

'घराणं तमासगिराचं' मध्ये तमाशा कलावंताची जीवनकहाणी येते. तसेच विजय सिरसाट यांची 'कालगर्भ', अनिल सहस्त्रबुद्धे यांची 'मातंगी', वैजनाथ कळसे यांची 'तीन भिंती', या दलित कादंबऱ्याही ग्रामीणतेचा भाग असलेल्या दिसतात. याशिवाय दलित-सवर्ण संबंधातील ताणतणाव अरूण साधूंच्या 'बहिष्कृत' मध्ये, सदा कुऱ्हाडेंच्या 'गाव-कुसाबाहेरची वस्ती' मधे चित्रित होतात. तसेच 'हाडकी हाडवळा' ही नामदेव ढसाळांची, 'माझं घर कुठाय?' ही योगेंद्र मेश्राम यांची 'युगविधान' ही बा. स. हाटे यांची या कादंबऱ्यांचाही उल्लेख करावा लागेल. व. बा. बोधेंच्या काही ग्रामीण कादंबऱ्या आहेत, त्यामध्ये 'जंगल', 'वाघीण', 'चांगभलं', 'बिजली', 'गजरी', 'तुणतुणं', 'वेताळ', 'टिटवी' अशा अनेक कादंबऱ्या बोधेंनी लिहिल्या आहेत. पाटील, बाई-बाटली असेच या कादंबऱ्यांचे स्वरूप आहे. यांचा वाचकवर्ग अफाट आहे.

## सारांश :

मराठी ग्रामीण कादंबरीचा आढावा घेताना काही गोष्टी ध्यानात येतात. त्यामध्ये म. फुले यांचे साहित्य ग्रामीण लेखकांना प्रेरणादायीच ठरले आहे. त्यात कृष्णराव भालेराव, धनुर्धारी (रा. वि. टिकेकर), ना. वि. कुलकर्णी आणि सानेगुरूजी यांच्या लेखनातून ग्रामीण कादंबरीच्या पाऊलखुणा दिसू लागतात. १९२४ नंतरच्या ग्रामीण कादंबरीची प्रेरणा गांधीवादात दिसते. परंतु ती प्रबळ ठरू शकली नाही. पहिल्या मराठी ग्रामीण कादंबरीचा मान रा. वि. टिकेकर ऊर्फ धनुर्धारी, यांच्या 'पिराजी पाटील' (१९०३) या कादंबरीस मिळाल्याचे दिसते. धनुर्धारी, ना. वि. कुलकर्णी यांचे ग्रामीण कादंबरी लेखन स्वयंभू वाटते. समाजातील वास्तव जीवन रेखाटण्याचा प्रयत्न दिसतो. ग्रामीण जीवन हेही साहित्याचा विषय होऊ शकते हे या लेखकांच्या लेखणाने दाखवून दिले.

१९४० ते ५० पर्यंतच्या कादंबरीचे निरीक्षण केले असता असे दिसते की तिच्या प्रेरणाही भिन्न आहेत आणि विषयही वेगवेगळे मांडले आहेत. तिच्या प्रेरणा गांधीवाद आणि मार्क्सवाद यात दिसतात. जीवनशोध घेणे, जीवनदर्शन घडविणे ही प्रेरणा असलेली दिसते. कादंबरीची कक्षा मोठी झालेली दिसते. तरीही फडकेतंत्राला ती विरोध करू शकलेली नाही. वेगळेपणाचे भान दिसते. र. वा. दिघे, ग. ल. ठोकळ, मर्ढेकर, बी. रघुनाथ, म. भा. भोसले, वा. ब. कर्णिक यांनी या काळातील मराठी ग्रामीण कादंबरी घडविण्यात हातभार लावलेला दिसतो. विभावरी शिरूरकरांनी तर 'बळी' सारखी कादंबरी लिहून मराठी ग्रामीण कादंबरीला

एक वेगळेच वळण दिले. काही प्रमाणात त्यामध्ये प्रादेशिक वैशिष्ट्यांचीही जोड दिली आहे. परंतु मुख्यतः ती ग्रामीणच होती. प्रादेशिकतेचा म्हणावा तितका स्पर्श झालेला नव्हता.

१९५० ते ६० च्या दशकतात मात्र ग्रामीण कादंबरीत चांगलीच भर पडलेली दिसते. यामध्ये श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर, व्यंकटेश माडगूळकर यांनी प्रादेशिकतेला साहित्यात महत्त्व मिळवून दिले. यावेळच्या कादंबरीत गांभीर्य जाणवते. खरे तर हेही लेखक मध्यमवर्गीय जाणिवा घेऊनच या जीवनाकडे वळलेले दिसतात. माडगूळकरांच्या 'बनगरवाडी' कादंबरीने ग्रामीण कादंबरीत मोलाची भर घातली. प्रादेशिकतेची कक्षाही तिने रूंदावली गेली. निसर्गावरच अवलंबून असणारं जीवन या प्रादेशिकतेमध्ये प्रामुख्याने चित्रित होताना दिसते.

१९६० ते १९७५ हा ग्रामीण कादंबरीचा संक्रमणकाळ म्हणावा लागेल. ही कादंबरी नव्या पिढीची नवनिर्मिती आहे. पेंडसे, दांडेकर, माडगूळकर ही पहिली पिढी ग्रामजीवनापासून थोडी दूर गेल्यासारखी वाटते. अगोदरच्या लेखकांच्या काही मर्यादापासून उद्धव शेळके, हमीद दलवाई, रा. रं. बोराडे, आनंद यादव हे बऱ्याच प्रमाणात दूर होते. सामान्य माणूस ग्रामीण कादंबरीचा केंद्रबिंदू बनला गेला. बोराडे, यादव, महानोर, महादेव मोरे, यांच्या लेखनात हा बदल स्पष्टपणे दिसतो. या काळातील ग्रामीण कादंबरी ग्रामजीवनाच्या अधिक जवळ गेली. उदा. 'गोतावळा', 'पाचोळा' इ. ही कादंबरी प्रादेशिकतेऐवजी ग्रामीणतेकडे जास्त झुकते. अण्णाभाऊ साठे, चंद्रकुमार नलगे, शंकर खंडू पाटील, श्रीपाद काळे असे काही लेखक प्रचलित रचनातंत्रात अडकले दिसतात. बाबा कदम, देवदत्त पाटील हे लेखक ग्रामीण घटकांचा वापर मनोरंजनासाठी करताना दिसतात. या काळात ग्रामीण कादंबरीने आपले स्थान जोपासले.

१९७५ नंतर ग्रामीण साहित्याची चळवळ सुरू झालेली दिसते. 'आधुनिक ग्रामीण साहित्य' हे नाव तिला दिले. यावेळी अधिक प्रमाणात कथात्मक साहित्य लिहिले गेले. या कालखंडात आनंद पाटील, पुरूषोत्तम बोरकर, बाबाराव मुसळे, वासुदेव मुलाटे, रामचंद्र पठारे, राजन गवस, उत्तम बंडू तुपे असे अनेक नव्या दमाचे लेखक पुढे आलेले दिसतात. या काळात तर ग्रामीण कादंबरीची कक्षा खूपच मोठी होताना दिसते. गावकुसाबाहेरचे दलित जीवन, भटक्या-विमुक्तांचे जीवन तसेच आदिवासी लोकांचे जीवन हे सारेच प्रवाह ग्रामीण कादंबरीत आलेले दिसतात.

या संपूर्ण ग्रामीण कादंबरीत रा. रं. बोराडे यांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण असे आहे. त्यांच्या 'पाचोळा' (१९७१), 'सावट' (१९८७) आणि 'चारापाणी' (१९९०) या ग्रामीण जीवनाचं

वास्तव चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या आहेत. बोराडेंनी ग्रामीण कथालेखक म्हणून जसे आपले स्थान निर्माण केले तसेच ते एक श्रेष्ठ कादंबरीकारही आहेत. बोराडे यांनी आपल्या आगळ्यावेगळ्या सामर्थ्याने आणि स्वलेखन बळावर मराठी वाङ्मयामध्ये मोलाची भर घातली असे म्हणता येईल.

अशा प्रकारे मराठी ग्रामीण कादंबरीची वाटचाल आणि तिचा विकास लक्षात घेतल्यावर पुढील प्रकरणामध्ये रा. रं. बोराडे यांच्या 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यामधील आशयविश्वाचा विचार करू.

## संदर्भ टीपा


१) स. शि. भावे, 'ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव' (आनंद यादव), प्रस्तावना पृ. ३.

२) आनंद यादव, 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या', पृ. ९.

३) आनंद यादव, 'ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव', पृ. ३१-३२.

४) द. ता. भोसले, 'ग्रामीण साहित्य : एक चिंतन', पृ. ११५.

५) नागनाथ कोत्तापल्ले, 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध', पृ. ७.

६) त्रिं. ना. अत्रे, 'गावगाडा', पृ. १२.

७) मधु कुलकर्णी, 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', ग्रामीण साहित्य विशेषांक, जुलै - डिसेंबर १९८०, पृ. ४५.

८) गो. मा. पवार, 'साहित्यमूल्य आणि अभिरूची', पृ. ११५.

९) आनंद यादव, 'ग्रामीण साहित्य, स्वरूप आणि समस्या', पृ. ७६-७७.

१०) तत्रैव, पृ. ७६.

११) नागनाथ कोत्तापल्ले, 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध', पृ. १५.

१२) रा. रं. बोराडे, 'प्रतिष्ठान', नोव्हें-डिसें, १९६४, पृ. ४५-४६.

१३) अविनाश सप्रे, 'स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरी : प्रवृत्ती आणि प्रवाह', पृ. १०५, (संपा. रवींद्र घवी - 'प्रदक्षिणा', खंड २ रा).

१४) रवींद्र ठाकूर, 'मराठी ग्रामीण कादंबरी', पृ. १२.

१५) आनंद यादव, 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', जुलै-डिसें- १९८०, पृ. ३२.

१६) रवींद्र ठाकूर, 'मराठी ग्रामीण कादंबरी', पृ. २८.

१७) आनंद यादव, 'मराठी साहित्य, समाज आणि संस्कृती', पृ. १२६.

१८) आनंद यादव, 'ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव', पृ. ११९.

१९) तत्रैव - आनंद यादव, 'ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव', पृ. १२८-१२९.

२०) कुसुमावती देशपांडे, 'मराठी कादंबरीचे पहिले शतक', पृ. ३००.

२१) नागनाथ कोत्तापल्ले, 'प्रतिष्ठान', १९८१, कादंबरी विशेषांक, पृ. ८३-८४.

२२) चंद्रकांत बांदिवडेकर, 'प्रतिष्ठान', १९८१, कादंबरी विशेषांक, पृ. १५६.

२३) रवींद्र ठाकूर 'मराठी ग्रामीण कादंबरी', पृ. ११३.